विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | **:** | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | **:** | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | **:** | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | **:** | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | **:** | **२०१८** |
| **वर्ष** | **:** | **त्रेपन्नावे** |
| **अंक** | **:** | **तिसरा** |
| **पृष्ठे** | **:** | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१८

## गणपत्रिका क्रमांक : १९७

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : त्रेपन्नावे अंक : तिसरा भाद्रपद/ आश्विन शके १९४० ऑक्टोबर २०१८

# *संपादकीय*

## उत्सवांची परंपरा आणि इतिहास

कुठल्याही समाजाचे सण आणि उत्सव हे त्याच्या संस्कृतीचे प्रतिबिंब असते असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. भारत हा एक अतीप्राचीन देश आहे. भारताचे जगाला दिलेले सर्वात मोठे योगदान म्हणजे भाषाविज्ञान. संस्कृत हे त्याचेच अपत्य. जगातल्या बहुतेक सर्व सभ्यता ज्या आज माहिती आहेत, त्या त्यांच्या भाषांमुळे. अनेक सभ्यता नष्ट झाल्या असल्या तरीही त्यांचे लिखाण कुठे तरी उत्खननांत सापडते. सुदैवाने भारतात मात्र संस्कृत भाषा कमीत कमी २५०० वर्षे प्रचलित आहे, आणि त्यामध्ये प्रचंड साहित्य निर्माण केले गेले आहे. आपल्या सण आणि उत्सवांची माहिती, वर्णनं या साहित्यामध्ये शोधता येतात. पण तो अभ्यासाचा विषय असतो. आपण एखादा सण किंवा उत्सव साजरा करतो तो परंपरेने आपल्यापर्यंत आलेला असतो म्हणून. आपले अनेक सण आणि त्यावेळी होणारे उत्सव याचा कुठेतरी निसर्गाशी संबंध असतो. या पार्श्वभूमीवर सध्याचे आपण साजरे करत असलेले दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव हे सण बघायला लागतात.

आज या सणांचे बकालीकरण, व्यावसायिकरण आणि राजकीयीकरण झाले आहे. या सणांच्या इतिहासामध्ये डोकावून पाहिलं तरी २५-३० वर्षापूर्वी देखील आपण हे सण असे साजरे करत नव्हतो. परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली एक अत्यंत हिडीस, आणि विकृत प्रथा रुजू होत आहे. ती विकृती अशीच चालू दिली तर कालांतराने त्यावर 'परंपरा' आणि 'प्रथेचे' शिकामोर्तब होईल. म्हणून याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.

बहुतेक सण किंवा उत्सव हे जरी धर्माच्या चौकटीत बसवले असले तरी, त्याला एक समाजशास्त्रीय असा महत्वाचा आशय असतो. आधुनिक जीवनशैलीमध्ये आपल्या राहणीमानामध्ये इतके प्रचंड बदल

(पृष्ठ क्र. ३० वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), कामे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

***अनुक्रमणिका***


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| गीतकृष्णायन-भाग ५- कुरूक्षेत्र | ५ |
| मन | ७ |
| निगम-आगमात्मक हिंदु धर्म | १४ |
| सुभाषित-कथा: मित्रभेद | २० |
| 'वास्तुपुरुषः वास्तुचैतन्याचा झरा | २१ |
| राजप्रणिधि अर्थात राजाचे दैनंदिन व्यवहार | २५ |
| गेले ते दिन गेले... | २८ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा — रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि — रु. ५
३) हरितालिका पूजा विधि — रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा — रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) — रु. १०
६) तुलसी विवाहविधि — रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) — रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५ (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना — रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण — रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी — रु. ४०
१३) गंगालहरी — रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण — रु. ३०
१५) सांख्यदर्शन — रु. ३०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) — रु. १५

**जुलै ते सप्टेंबर २०१८**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)/ ऐच्छिक देणगीदार**

प्रा. अशोक रामचंद्र ठाकूर, दहीसर (पू), मुंबई - रु. १०००/-
श्री. विकास व्यंकटेश भिडे, ठाणे (पू) - रु. १०००/-
श्री. श्रीकांत अनंत पत्की, चारकोप, कांदिवली (प.) - मुंबई, रु. १०००/-
श्री. सुबोध गदाधर भाटवडेकर, विलेपार्ले (पू.), मुंबई - रु. १०००/- + १०००/-
श्री. राजाराम दिनकर चितळे, विलेपार्ले, मुंबई - रु. ५००/-
श्री. दत्तात्रेय राजाराम ताटके, लांजा, जि. रत्नागिरी - रु. ५००/-

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३६ वा

**विरतिपयसि द्दनेभ्यः**
**शाम्यन्ति शिखण्डिनो ध्वनयः।।**[४०१]

शब्दशः – ढगांनी जळवर्षाव बंद केला की मोरांचे केकापण थांबते.

शिते तवर तो भुते भोवती

पहिली ओळ : वितरति यावद्दाता तावत् सकलोह्वह्वऽपि भवति कळभाषी।

जोपर्यंत दाता देत राहतो तो पर्यंत सगळे गोड असतात.

**विन्ध्ये विन्ध्यसमानाः करिणाः**
**बन दर्पणे लघवः।।**[४०२]

विन्ध्य पर्वतावर विन्ध्य पर्वताएवढाले हत्ती आरशात लहानच दिसतात.

आश्रयवशेन सततं गुरुता लघुता च जायते

माणसाला मिळालेल्या आश्रयाप्रमाणे त्याचा दर्जा ठरतो.

**व्यवसायद्वितीयानां नाप्यपारो महोदधिः।**[४०३]

उद्योगी माणसांना महासागर देखील अपार नाही.

**नात्युच्चत शिखरो मेरुर्नातिनीचं रसातलम्।**

म्हणून मेरू पर्वत अतिशय उंच नाही व रसातळ खोल नाही.

**विधेर्विचित्राणि विचेष्टितानि**[४०४]

विधीची करामत अजब आहे.

**यः सुन्दरस्तद्वनिता कुरुपा**
**या सुन्दरी सा पतिरुपहीना**
**यत्रोभयं तत्र दरिद्रता च**
**विधेर्विचित्राणि ....।।**

एखादा देखण्या माणसाची बायको कुरुप असते व रुपवान स्त्रीचा पती कुरुप असतो. जेथे दोन्ही सुस्वरुप / कुरुप असतात तेथे दारिद्र्य दिसून येते.

**वृद्धा नारी पतिव्रता।**[४०५]

वृद्ध स्त्री पतिव्रता असते (यात काय नवल?)

**आर्तोदवान्नमस्यन्ति,**
**तपः कुर्वन्ति रोगिणः।**

निर्धना दानमिच्छन्ति वृद्धा नारी...

**श्वकार्यमद्य कुर्वीत।**[४०६]
**पूवाह्णे चापराहिःकम्।**
**न हि प्रतिक्ष्यते मृत्युः**
**कृतमस्य न वा कृतम्।।**

उद्या करायचे ते आज करा. दुपारी करायचे ते सकाळीच उरकून टाका. ह्याला करायचे होते ते काम ह्याने केले किंवा नाही हे मृत्यू पाहत बसणार नाही.

**स्थूणानिखन न्याय।**[४०७]

(पृष्ठ १३ वर)

**'विनंती' – जाती रसना**

क्षेत्रात या जयश्री धर्मासवे वसावी
हा व्यूह भेदण्याची आज्ञा मला असावी ॥धृ॥

तातांपरी कुणाला हा व्यूह जेय नाही
ही कल्पना वृथाची अणुमात्र सत्य नाही
मी पुत्र केसरीचा चिंता मनी नसावी ॥१॥

उदरात माउलीच्या ज्ञानास प्राप्त केले
व्यूहास सव्यसाची कथिते जसे जहाले
या घोर संगरी ती विदया मला स्मरावी ॥२॥

समरी मला करू दे सीमा पराक्रमाची
मागे त्वरा करोनी येतील सव्यसाची
धरणीच कौरवांना पळण्यास अल्प व्हावी ॥३॥

त्यागून काळजीला वर एकमात्र दयावा
अभिमन्यु आज येथे जेता तरी ठरावा
वा धर्म रक्षिताना काया रणी पडावी ॥ ४ ॥

अखेर धर्मराज आणि धृष्टद्युम्नानं नाईलाजानं अभिमन्यूच्या प्रस्तावाला संमती दिली.

अभिमन्यूनं शौर्याची कमाल केली. पहाता पहाता त्यानं चक्रव्यूह भेदला आणि कौरव सैन्याच्या अगदी आतपर्यंत मुसंडी मारली. मात्र तिथे पोहोचेपर्यंत तो अगदी थकून गेला. चक्रव्यूह भेदण्याचं ज्ञान आपण प्राप्त केलंय खरं, पण एकदा यशस्वी रितीनं तो भेदल्यावर मग सुरक्षित परत बाहेर कसं पडावं याचं ज्ञान आपल्याला नाही याची त्याला जाणीव झाली. सर्व बाजूंनी शत्रूनं त्याला घेरून टाकलं आणि अनेक कौरवांनी विविध शस्त्रांनी एकदमच त्याच्यावर जोरदार हल्ला केला!

त्याही परिस्थितीत अभिमन्यूनं प्रयत्नांची शर्थ केली, पण अखेर चहूबाजूंनी ज्वालांनी वेढलेला वृक्ष उन्मळून पडावा तसा रक्तबंबाळ होत्साता तो रणांगणावर कोसळला! तत्क्षणी जयद्रथादी सात कौरव त्याच्याजवळ आले आणि कुत्सितपणे हसत त्यांनी अनेक प्रकारे अभिमन्यूचा अवमान केला. जयद्रथाने तर त्या शस्त्रहीन, असहाय्य आणि आसन्नमरण क्षत्रिय वीराच्या शिरकमलावर लत्ताप्रहार करण्यासही कमी केलं नाही!

अभिमन्यूच्या सहाय्याला तोपर्यंत धावून आलेल्या अर्जुनाला हे दृश्य दिसलं. शोकविव्हल आणि क्रोधायमान झालेल्या अर्जुनानं ते पाहून तत्क्षणी भीषण प्रतिज्ञा केली, जयद्रथा, उदया सूर्यास्ताच्या आत जर मी तुला यमसदनाला पाठवलं नाही तर मी अग्निप्रवेश करीन!

ती प्रतिज्ञा ऐकताच भेदरून जयद्रथ युद्ध सोडून पळून जाण्यास सिद्ध झाला. पण 'अर्जुनाचा काटा काढण्याची ही सुवर्णसंधी आहे, आमच्या प्रेतांवरच पाय देऊन अर्जुन तुझ्यापर्यंत पोहोचेल' अशी आश्वासनं देऊन दुर्योधनानं त्याला थांबवून घेतलं.

दुसऱ्या दिवशी द्रोणांनी परत एक अभेद्य व्यूह रचला. दातओठ खाऊन अर्जुन त्यावर तुटून पडला. पण दिवस कलू लागला तरी त्याच्या प्रयत्नांना यश येईना! अखेर कृष्णानं सुदर्शन चक्रानं सूर्याला झाकून टाकलं. त्यामुळं सूर्यास्ताचा आभास निर्माण झाला. युद्ध थांबलं. अर्जुन चिता रचून अग्निप्रवेश करण्यास सिद्ध झाला. जयद्रथ आणि सर्व कौरव अर्जुनाभोवती ते दृश्य बघण्यास जमा झाले, अर्जुनाला खिजवू लागले, मोठमोठयानं हसून एकमेकांना टाळया देऊ लागले!

बेसावध जयद्रथ अशा तऱ्हेनं अर्जुनाच्या बाणांच्या कक्षेत आलेला दिसताच कृष्णानं सुदर्शन चक्र सूर्यासमोरून काढून घेतलं आणि त्वरित तो अर्जुनाला म्हणाला...

**'हा सूर्य हा जयद्रथ' – जाती बलाका**

नभी भानु तरी करी जयद्रथ उन्मादे उपहास
अर्जुना धाडी त्या नरकास ॥धृ॥

दुष्ट हाच तो घोर या रणी
हतबल अभिमन्यूस घेरुनी
लत्ता शिरकमलास मारुनी
संगे घेउन नृशंस साथी पाठवि यमसदनास ॥१॥

अवमानित तो स्मरून तत्क्षण
शपथ घेतली तुवा विलक्षण
अग्निकाष्ठ तू करिसी भक्षण
ना जरी दुष्टा मारिसि जाण्यापूर्वी भानु अस्तास ॥२॥

द्रोणांनी मग व्यूहच रचिला
त्वेषाने जरि तू आक्रमिला
व्यूह तरी तो नसे भंगला
पार्था नच ये सुमधुर फल ते आज तुझ्या यत्नास ॥३॥

प्रसंग बाका मीच ताडले
चक्र रवीच्या समोर धरले
त्याने रविच्या प्रभे झाकले
रात्र जाहली ऐसा होई त्यायोगे आभास ॥ ४ ॥

निज प्रतिज्ञा पूर्ण कराया
जरी अधिर तू पांडवराया
व्यूह मोडुनी येत बघाया
दुष्ट जयद्रथ त्याजुनी साऱ्या त्या कौरव सैन्यास ॥५॥

तव बाणाच्या कक्षे ये तो
आता मीही लगेच करतो
दूर चक्र मग सूर्य तळपतो
पाहू शकती ना कुणी नभी कुठल्याही अभ्रास ॥६॥

उचल गांडिवा बाण जोडसी
कार्या अपुल्या पूर्ण करीसी
दिगंतरा मस्तक पाठविसी
मार तयाला ठेवी मजवर पूर्ण मनी विश्वास ॥७॥

पांडवांचा मार्ग निष्कंटक होण्यासाठी द्रोणाचार्यांचा काटा मार्गातून दूर होणं आवश्यक होतं. शस्त्रविद्येत तर द्रोण कौरव पांडवांचे गुरूच होते! उघडया मैदानात त्यांचा सामना करून त्यांना पराभूत करणं अत्यंत दुरापास्त आहे याची कृष्णाला पूर्ण कल्पना होती. म्हणून पांडव शिबिरात त्यानं प्रस्ताव मांडला, द्रोणाचार्याचं मनोधैर्य खचवल्याशिवाय त्यांना हरवण्याचा दुसरा मार्ग मला तरी दिसत नाही.
(पृष्ठ १९ वर)

''ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे।... तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही'' ही प्रार्थना करतांना 'मन' म्हणजे काय? हा विचार मनात आला. कर्मेन्द्रिये वा ज्ञानेन्द्रियासारखी मन ही भौतिक वस्तू नाही तर मनात जे जे येते ते या ज्ञानेन्द्रिय व कर्मेन्द्रियाद्वारे केले जाते. मन हे कारक/कर्ता आहे पण मनास आकार वा दृश्य रुप नाही. मन सगुण वा निर्गुण कसे आहे ते कळणे कठीण आहे. मानसिक शक्ती पण अगाध, अगोचर आहे. मानसिकता तसेच मनोबल हे मनाचे सामर्थ्य आहे. मन ही एक चैतन्य शक्ति आहे. सूर्यप्रकाश जसा दिसत नाही तशी ही शक्ती आहे चैतन्य आहे. सूर्यकिरणांप्रमाणे अदृश्य पण तिचे अस्तित्व कृतीतून तसेच ज्ञानेन्द्रिय व कर्मेन्द्रिये यांच्या कृतीतून कळते जसे सूर्यप्रकाशामुळे विश्व व विश्वातल्या वस्तू चर अचर दिसतात तसे.

माणसाला परमेश्वराने बुद्धीसामर्थ्य आहे, ते असीमित आहे. इतर चर प्राण्यांमध्ये ते एका विशिष्ट मर्यादेचेच आहे. त्यामुळे मानवाची प्रगती अतिशय वेगाने अमर्यादित होत गेली, होत आहे व होतच राहणार. मन व बुद्धी यांचाही संबंध आहे. माणसाचे मन त्याच्या शरीरआधाराने राहते तरी त्याला शरीरासारखे लांबी, रुंदी (जाडी) वजन इ. मोजमापे नसतात ना त्याला रंग, गंधही. त्याचा विस्तार किती आहे, किती होईल, कसा होईल, कधी होईल, इ. चे ना कसलेही गणित / भाकीत करता येते. मनुष्य वयात आला की शरीर व मन विकसित होते. शरीर व्यक्त तर मन अव्यक्त म्हणून मानवी जीवनात मनाचे सुद्धा दोन खंड/भाग प्रत्ययास येतात. व्यक्त भाग मनाचा त्याच्या नित्य कर्मात दिसतो. तर मनाचे अव्यक्त रुप/भाग हे मोठे, समग्र व शक्तीरुप असून ते व्यक्त मनाला शक्ती अखण्ड पुरविते. व्यक्त मन आपण ओळखू लागतो सततच्या व्यक्तत्वामुळे पण आपले अव्यक्त मन आपण ओळखू शकत नाही. माणसाचे सर्व व्यवहार व्यक्त मनानेच होतात. आयुष्यभर विचारविकार, कल्पना, भावना, स्मृती, कृती, वासना, संकल्प. सुख दुःख निवृत्ती इ. व्यक्त चालत असलेला क्रम/ व्यवहार असतो व हे सर्व त्यांच्या ''मी'' पणा भोवती केन्द्रित असलेले व्यक्तमनाचे खेळ असतात. या व्यवहारात ज्ञानेन्द्रिये व कर्मेन्द्रियाद्वारे अखण्डपणे व्यक्त मन बाह्य जगाचे वस्तू, व्यक्ति, घटना इ. चे संस्कार होऊन त्याचे एक संस्कारित रुप घेते जी त्या माणसाच्या व्यक्तिमत्वाची ओळख होते व हे सर्व संस्कार भांडार या व्यक्त मनाच्या अंतर्भागात रहातात ज्यास आपण अंतर्मन म्हणते. हे सर्व संस्कार म्हणजे आठवणी, विकल्प, कडूगोड अनुभव, दुराग्रह, भोगवासना आवडनिवड, न्याय/अन्याय जिवंत असतात व म्हणूनच ते शक्तिवान असून त्यांचे दृश्य परिणाम त्याच्या दैनंदिन व्यवहारात उमटतात व त्यावरुनच त्याची ओळख, विद्वान, त्यागी,

सज्जन, दुर्जन, कपटी, आपमतलबी राजकारणी, मुसद्दी, भक्तीवान, कलाकार, शास्त्रज्ञ इ. प्रकारे होत जाते, कारण व्यक्त मनाचे व्यवहार ह्या संस्काराप्रमाणे हेतूप्रीत असतात. माणसाचे पशुतुल्य वर्तनही त्यातूनच प्रगटते. व्यक्त मनाच्या सगळ्या वासना पूर्णपणे कधीच तृप्त होऊ शकत नाहीत अशी रचना या मानवीजीवनाची आहे. माणसांच्या मनातील सर्व वासना पूर्ण न होण्याने त्या दडपून टाकाव्या लागतात पण त्या नष्ट होत नाहीत म्हणून मानवी मनाला हिमनगाची उपमा देतात. जसा हिमनगाचा केवळ १/८ भाग पाण्यावर दिसतो पण ७/८ पाण्याखाली असतो. ज्याची आकार विस्ताराची कल्पना करता येत नाही तसे हे व्यक्त मन असते. नित्यव्यवहारातील व्यक्तमन, त्याखालचे अंतर्मन व त्याही खालचे अबोध मन (जेथे मनाला शक्ती पुरवठा करणारा समग्र वासना संचय असतो) मिळून किंवा जागेपणचे मन, सूक्ष्म शरीर व कारण शरीर मिळून माणसाचे मन बनते.

माणसाचे मन बाह्य जगात तरी वावरते वा अंतर्यामी. बाह्य जगात वावरतांना ते ज्ञानसंचय करते तर अंतर्यामी वाटचालीत कर्मेन्द्रिये वा ज्ञानेन्द्रिये याकडे पाठ फिरवून सुयोग्य मार्गदर्शनाने हृदयातील ईश्वरदर्शन करुन घेण्यापर्यंतही प्रगती करु शकते. ही मनाची प्रचण्ड विलक्षण शक्ती ज्याला कळते तोच मन जिंकण्याचे महत्व जाणू शकतो. मन स्वाधीन म्हणजे ईश्वरशक्ती स्वाधीन मन वश करणे म्हणजेच ईश वश करणे कारण विश्वव्यापी मनाचीच अति सूक्ष्मावृत्ती म्हणजे मानवी मन व विश्वमन हे ईशासारखे सूक्ष्म, सर्वज्ञ समग्र, सर्वशक्तियुक्त, द्वंदमुक्त, भेदतील आहे. म्हणून मन स्वाधीन करणे हे अत्यंत महत्वाचे ठरते. ईशमन वा विश्वमन हेच मानवी मनाचे मूळधाम होय. माणसाचे मन फळाची आशा धरणारे असल्याने त्याच्या आधीन नसते त्यामुळे सदैव असमाधानी व आसक्त असते. माणूस बुद्धीमान प्राणी आहे त्यामुळे विज्ञान व तत्वज्ञान दोन्हीमध्ये बौद्धिक सामर्थ्य तो वापरतो. भोगाची साधने शोधतो तसेच ईशप्राप्तीचे अस्तीत्व शोधण्यासाठी अंतःस्फूर्ती/प्रतिभा त्या पायरीपर्यंत बृद्धीने जातो येथे बुद्धीसीमा संपते. प्रतिभा ही मानवीमनाची दुसरी ज्ञानशक्ती आहे.

बुद्धी सर्वमाणसांमध्ये असते पण प्रतिभा सर्वांमध्ये आढळत नाही. खंडित वा अंशात्मक प्रतिभा असणारे व संपूर्ण प्रतिभा असणारे असे दोन वर्ग आढळतात. मनाचे रुपांतरानेच प्रतिभा उदय व पूर्ण विकास होतो व मन रुपांतराची प्रक्रिया मनाचे शक्तीनेच घडविता येते हेच माणसाचे वैशिष्ठ्य आहे.

माणसाचे मनाचे मूलद्रव्य वासना हे सर्व कर्मप्रेरणांचे उगमस्थान त्यामुळे जोपर्यंत कर्मप्रेरणा असतात तोवर खरी शांती अनुभवता येत नाही. जेव्हा ईशमनाशी मानवी मनाचे विलीनीकरण होते तेव्हाच ही मानसिक अशांती नष्ट होऊन मन निर्विकार निर्वासन बनते. वासनेतून उठणारी वृत्ती वेळीच सावधानतेने आवरली तर ती वासनेत जिरते व हाच खरा अध्यात्म मार्गावरचा अभ्यास आहे. अश्या

रीतीने वृत्तीप्रवाह थांबतो व मनाची शक्ति खर्च होत नाही. परिणामी वासनासंच क्षीण मृत होतो व या वृत्तीदमनानेच मन अंतर्मुख होऊन शक्तिमान बनते व अलौकिक सिद्धीप्राप्ती होतात. त्यांही त्यात न गुंतता साधन सुरु ठेवल्यास मानव मूळधामास पोचतो. मनाचे दमन सोपे नाही. मनाला अंतर्मुख करण्यास दीर्घकाल चिकाटीचा अभ्यास हवा तरच मन विचारशून्य होऊन वृत्तीशून्य होते.

संत महात्मे यांचे मन विश्वमन असले झालेले कठोर साधनेने व गुरुकृपेने व त्यामुळे ते जगाचे कल्याणासाठी जगतात पण अध्यात्मातील एक विरोधाभास येथे प्रत्ययास येतो जेव्हा हे संत जनतेला सारासार विचार करायला शिकवतात.

भावना ही पण मनाची मोठी शक्ति महत्वाची मनोवृत्ती जी अनुभवास येते. काम क्रोधादि षडरिपू, जिज्ञासा, भीति, दया इ. भावना आहेत. त्या व्यक्तिगत व दैनंदिन व्यवहारात प्रत्ययास येतात. त्या कधी सुप्त असतात पण केव्हा उचल खातील हे सांगता येत नाही. भावना मनाची विचारशक्ती लोप करतात. शरीरावर दृश्य परिणाम करतात. उत्कट भावनावृत्ती हे मनाच्या तळमळीचे प्रगट रुप ज्यामध्ये मन एकाच ठिकाणी येते व भावस्थिरवृत्ती होते. माणसाचे मन ईश्वराशी तदाकार करण्याची स्थिरवृत्ती म्हणजेच भक्ति व असा तदाकार झालेला जो असतो त्याच्या सर्व वासना संपूर्ण भस्म झालेल्या असतात व तो कायमस्वरुपी संत होतो. म्हणजेच संत हे ईश्वराशी समरस झालेले असतात. त्यांच्यात शुद्ध व निस्वार्थी प्रेरणा येते म्हणूनच ते 'सद्‌गुरु' होतात. असा सद्‌गुरुंना अनन्यभावे शरण जाणाऱ्यास सद्‌गुरु कृपाप्रसादाद्वारे शक्तीपात करून आपली आत्मशक्ती त्या माणसाचे मनात संक्रमित करून त्याचे मन सामर्थ्य वर्धन करून शांत करतात.

मानवी जीवनातील मनाचे महत्त्व सांगणारे वर्णन नाथ भागवतातील भिक्षुगीतात आहे हे संक्षेपाने असे – ''१) मनाने आपल्या आधीन सर्वांना केल आहे. पण ते कोणासच आवरता येत नाही. देवांनाही ते जिंकणे कठीण त्यास कोण आवरु शकेल? २) मन इंद्रियांचा राजा त्यामुळे सर्व इंद्रिय पसारा त्याचे आधीन असतो. ३) मन अतिबलाढ्य–काळसुद्धा मनापुढे नामोहरम होतो. ते काळालाही आटोपत नाही. ४) मनास ना व्याधी होत ना रोग– ते त्रैलोक्याला नाचवते–त्याला जिंकणारा पराक्रमी कोण? ५) मनाचा सर्वोत्तम गुण म्हणजे ते जर परमार्थ मार्गाकडे वळले तर चारी मुक्तींना दासी बनवून परब्रह्म हाती आणते. ६) मनच मनाचे साधक व बाधक आहे.''

इंद्रियांवर विजय मिळवून मन निर्विषय करणे हेच मोक्षप्राप्तीचे साधन. अनेक संतांनी मनावर लिहिले आहे. संत रामदासांना मनोबोध प्रसिद्ध आहे. संत तुकारामही वेगवेगळ्या अभंगात हेच सांगतात. उदा. ''मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण।।'', ''रात्रंदिन अम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन'', ''मना तेथे धाव घेई। राही विठोबाचे पायी।।'' इ. 'श्रीसाईसत्‌चरित' या साईबाबांचे

पोथीतही अध्याय ४९ मधील ओवी क्र.१७४ मध्ये ''मन करोनिया निर्वासन। ईशकृतीचे करा निरीक्षण। होईल सहज इंद्रिय दमन। विषय सेवानविस्मरण।।'' हे या मनावरती भाष्य व मन ताब्यात ठेवण्याचा उपदेशपर लिहिले आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतही ''सुख दुःखे समेकृत्वा। लाभालाभौ जयाजयौ।'' असे मन ताब्यात ठेवल्यानेच होते. अशी मनवृत्ती असणाराच मोक्षास जाण्यास पात्र असतो हे अप्रत्यक्षपणे प्रतिपादीले आहे. श्रीसाईबाबांनी हि परमार्थ मार्ग अवलंबिणाऱ्यास विवेक राखून इंद्रियरुपी अश्वांना आवरण्यास उपदेश केला आहे. ज्यायोगे ते मोक्षपदास जातील. अध्याय ४९ साईसतवरील पोथी– ओवी क्र. १८२ व १८३ त्या अशा ''ऐसा मनःसमाधानपर। निग्रही दक्ष कुशल चतुर। भाग्ये लाधलिया सारथी चतुर। कैसे दूर विष्णुपद।।१८२।। तेच पद परब्रह्म 'वासुदेव' अपर नाम। तेच सर्वोत्कृष्ट परम। परंधाम परात्पर।।१८३।। मनाची अशी अवस्था भगवद्‌गीतेतही (अ. ४ श्लोक २२) प्रतिपादन केली आहे. ''यदृच्छालाभसंतुष्टो व्दंव्दातीतो विपरसरः। समः सिद्धावसिद्धो च कृत्वापि न निबध्यते '' हातो श्लोक मनाची आनंदवृत्ती सर्वसामान्य जनतेस लाभली/ साधली तरी खरी सुख, समृद्धी शांती मिळेल असे श्री साईबाबा उपदेश करतात. अ.१ – श्रीसाईसतचरित – ओवी ६४ व ६५ '' परमात्मसुख परमात्मप्राप्ती। ब्रह्मानंदस्वरुप स्थिती। इत्यादि ही शब्दजाळाची गुंती। आनंदवृत्ती पाहिजे।।६४।। व '' जयासी बाणली एक वृत्ती। सदासर्वदा ही एक स्थिती। सुखशांती समाधान चित्ती। परमप्राप्ती ही हीच।।६५।।'' या ओव्या मनाच्या आनंदी प्रसन्न रहाण्याने होणारी फलप्राप्ती सांगतात म्हणजचे मनाचे सामर्थ्य किती आहे ते पण त्यावरून आकलन होते.

संत तुकाराम संसारी संत होते. मन षडरिपू आहारी जाऊन पापे घडतात म्हणून मनाला सदविचराचे कवच घातले तर त्याचे रक्षण होईल. मन जिंकणे वा ताब्यात ठेवण्यासाठी त्यांनी विठ्ठलनाम हा उपाय सांगितला. ''चित्त समाधान। तरी विष वाटे सोन।। मनाच्या तळमळे। चंदनही अंग पोळे।।'' यासारख्या अभंग पंक्ती मनाचे अनारोग्यावर आहेत. षड्‌रिपूमुळे अपमान, अपकीर्ति सहावी/ सहन करावी लागते. तेव्हा षड्‌रिपूंवर विजयासाठी मनाला दया, क्षमा, शांती समाधान यांनी संस्करीत करावे असे ते उपदेशतात. असे संस्कारीत मन ज्याचे असते त्याचा मनोजय होतो. ''क्षमाशस्त्र जया नराचिया हाती। दुष्ट तयाप्रती काय करी।। तृण नाही तेथे पडला दावाग्नि । जाय तो विझोनी आपसया।। तुका महणे क्षमा सर्वाचे स्वहीत। धरा अखंडित सुखरुप।। या अभंगाद्वारे मनाचे सुसंस्करणाने सामर्थ्य किती असते हे ते सांगतात.

मनाचे आरोग्य जेथे। देवतांचा वास तेथे असेच म्हणावे लागेल. प्रसन्न मनाची विलक्षण ताकद यावर त्यांच्या अभंग '' मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण मोक्ष अथवा बंधन। सुख, समाधान इच्छा ते।। मने प्रतिमा स्थापली। मने धनपूजा केली। मने इच्छा पुरविली। मन माऊली सकळांची।। मन गुरु

आणि शिष्य। करी आपुलेचि दास्य। प्रसन्न आप आपणास। गति अथवा अधोगती।। साधक वाचक पंडित। श्रोते वक्ते ऐका मात। नाही नाही आन दैवत। तुका म्हणे दुसरे।।'' अतिशय बोलका स्पष्ट आहे.

संत तुकाराम मनाची बैठक सत्वगुणावर असावी हे सांगतात. ही कवचकुंडले परीधान करणारे मन ज्याचे त्याने हरी नाम घेतले की षड्‌रिपूंवर त्याचा निश्चित विजय. संत तुकारामांचे मन निर्विकार होते म्हणूनच ते संत झाले. मोठमोठे साधुसंत ज्यांचे मन असे नसते त्यांची ''ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला'' अशी अवस्था होते. विश्वामित्रांचे असेच उदाहरण आहे. तपस्वी होऊनहि मेनकेमुळे तपोभंग झाल्याचे.

मन हे जीवननौकेचे सुकाणू आहे. त्यामुळे त्याचे सुनियंत्रण यावर त्यांचा कटाक्ष आहे शरीरारोग्यासाठी भौतिक औषधे तर मनाचे आरोग्यासाठी सुसंस्कार, सत्संगती, सदाचरण, संतसमागम ही औषधे आहेत. देह व्यापार व मनोव्यापार यात जमीनअस्मानाचा फरक आहे. देह विकलांग झाला तरी मन प्रबळ असते पण मनास विषाद/औदासिन्य आले की हतवीर्य होतो मानव. संत ज्ञानेश्वरांचा विषाद घालविणारे मुक्ताइचे ताटीचे अभंग व अर्जुनविषादासाठी भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेली भगवद्‌गीता ही उदाहरणे आहेत. ''न मनाची चिंता। काही माझेविशी आता।।'' या अभंगात मनावर नियंत्रण असल्याने हे साधले असे तुकाराम म्हणतात.

मनावर विजय प्राप्त करणारा शूरवीर असेही एका अभंगांत ते प्रतिपादन करतात तो अभंग असा ''मन गुंतले लुलया। जाय धावोनि लया वाया। मागे परतवी तो बळी। शूर एक भूमंडळी।। येऊनिया घाली घाला। नेणो काय होईल तुला। तुका म्हणे येणे। बहुत नाडिले शहाणे।।'' तसेच मनाला ते उपदेशही करतात त्याचा अभंग ''फजितखोर मना किती तुज सांगो। नको कोणा लागो मागे मागे। स्नेहवादे दुःख जडलेसे अंगी। निष्ठूर हे जगी प्रेमसुख।।'' व ''निंदास्तुती कोणी करो दया मायां न धरी चाड या सुख दुःखा। योगिराज का रे न रहाती बैसोनी। एकेचि आसनी याच गुणे।। तुका म्हणे मना पाहे विचारुन। होई रे कठीण वज्र ऐसे।।'' हा अभंग दोन्ही तून मनाला केलेला उपदेश मनन योग्य सार्थ आहे.

मन वज्रासारखे कठीण कसे करणार? त्यासाठी समर्थ कोण? यावर संत तुकाराम प्रत्यक्ष विठ्ठलालाच साकडे घालतात तो अभंग ''मन माझे चपळ। न राहे निश्चल। घडी एक पळ स्थिर नाही। आता तूं उदास नव्हे नारायणा। धाव मज दीना गांजियेले।। धाव घाली पुढे इंद्रियाचे ओढी। केले तडजोड चित्त माझे। तुका म्हणे माझा न चले सायास। राहिलो हे आंस धरुनी तुझी।।''. म्हणजेच जनांनी अप्रथ्यक्षरित्या देवावर भार टाकावा तर मननियंत्रण साधेल. परत परत ते मनाला उपदेश करतातच तो अभंग ''मना सांडी हे वासना दुष्ट खोडी। मती मानसी व्यर्थ एक हे व्यर्थ गोडी। असे हीत माझे तुज एककाही। धरी विठ्ठली पाही हे प्रेमसुख।।'' मनाची

उत्क्रांती सद्विचारानेच होते ती इतकी की मन साक्षात ईश्वर होऊ शकते. यावर सुंदर अभंग तुकारामांचा असा आहे. ''असंती कंटाळा हा नव्हे मत्सर। ब्रह्म ते विकारविरहीत। तरी म्हणा त्याग प्रतिपादलासे। अनादि हा असे बैराकार। सिजले हिरवे एक नावे धान्य। सेवनार्थ भिन्न निवडी जे। तुका म्हणे सूती साक्ष नारायण। अवगुणी दंडण गुणी पूजा।।''

मनाचा देव होणे असामान्यत्वाचे लक्षण आहे. त्यावर संत तुकारामांचा हितोपदेश अत्यंत समर्पक व महत्वाचा आहे. हा अभंग असा ''आपले आपण जाणवे स्वहित। जेणे राहे चित्त समाधान। बहुरंगे माया असे विखुरली। कुंठीतची जाली होता वरी। पूजा ते बोला पिताच्या पितरी। भाव विश्वंभरी समर्पाचा। तुका म्हणे गेला फिरोनिया भेद। मग होतो देव मनाचाचि।।''

मन शुद्ध हवे.  शुद्ध मन तया काय करीसी माळा। मंडित सकळा भूषणासी। तन मन धन दिले पुरुषोत्तमा। आशा नाही कवणाची।। तुका म्हणे तो परिसाहुनी आगळाा। काय महिमा वर्णू त्याची।। हा त्यांचा अभंगही मन शुद्धतेचे महत्व विषद करतो.

संत तुकारामाचे हे अभंग मनावर लिहिलेले स्पष्टपणे मनोजय का महत्वाचा आहे हे प्रतिपादन करतात. 'मन' हा विषय किती विशाल, अनेकांगी आहे हे लक्षात येईल.

प्रत्येक मनुष्याचे मनाचे मुख्यत्वे ५ भाग पडतात. १) मन २) चित्त ३) बुद्धी ४) अंतःकरण व ५) अहंकार. कोणत्याही कर्मास यापेकी मन, बुद्धी व अहंकार हे तीन भागच कारणीभूत होतात. कोणत्याही कर्म ठिकाणी मनाचे केंद्रीकरण, बुद्धीने अवलोकन व अहंकाराने कर्तेपणाची अभिमानजागृति व्हावी लागते. अर्जुनाने जो पक्षीनेत्र भेदला शरसंधानाने त्यावेळी मनाचे केन्द्रीकरण प्रथम करावे लागले आहे.

मनोजय कष्टसाध्य आहे व त्यासाठी सद्गुरुकृपा हवी. पारा जमीनीवर सांडला तर तो गोळा करणे. अतिदुष्कर कारण जो जो गोळा करण्यास जावे तो तो त्याचे पुन्हा सूक्ष्म कण होतात व हातून निसटतात. हे गोळा करण्याचे दुश्तर कार्यासारखेच मनावर विजय प्राप्ती हे कार्य होय. हा मनोजय नामसाधाना, सत्संगती व सद्गुरुकृपा यामुळेच साध्य होतो. (ज्ञानेश्वरी अभंग १२ मधील ३ री ओवी ''पारियाचा रवा घेता भूमीवरी। यत्न परोपरी साधन जैसे।)

मेहेरबाबांनीही मनासंबंधी विचार प्रगट केले ते असे. पेटको भूखा रखनेसे आत्माकी (परमात्माकी) प्राप्ती मे कोई सहायता नही मिलती। मनको भूखा रखना चाहिए, मन को खाली कर देना चाहिए। तभी परमात्मा मिलेगा। जबतक मन नही मरता तब तक हम बंधनोसे मुक्त नही हो सकते इसलिए मनकोही उपवास देना चाहिए। मन का भोजन है विचार, कल्पना, तर्क-वितर्क, काम, क्रोध, मद, मोह, माया, मत्सर, स्वार्थ, ढोंग, छल, कपट इ.। मनको भूखा रखनेसे मनमे दूसरे विचार नही आते। मानवी मन ये संग्रह

किये हुए व सदा बदलने वाले संस्कारोंका एक भारी बोझा है। विचारोंकी शुद्धता यही मन का उपवास है। वैसही कोई भी विचार मन में न आने देना यह भी मन का उपवास है।

तेव्हा ''मन'' यावर अनेक साधुसंतांनी लिहिले आहे ते सर्व एकत्रित करणे हा प्रचंड व्यापाचा कार्यभाग आहे. सर्वसामान्यांनी मनावर विजय मिळविणे दुरापास्त असले तरी मन प्रसन्न निर्मळ आनंदी ठेवण्यासाठी सत्‌संगती, नामस्मरण, सद्‌गुरुकृपा प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा. तुकाराम गाथा, मनोबोध, ज्ञानेश्वरी, भगवद्‌गीता यासारखे ग्रंथ चिंतन मनन करावेत.

मन सबल, सक्षम, सात्विक, सद्‌धर्मी, सत्‌चरणी, स्वानंदी असावे. मनाच्या दुर्बलतेनेच अर्जुन युद्धविन्मुख झाला त्यास मनोबल प्राप्त करून दिले भगवान श्रीकृष्णाने भगवदगीता सांगून हे लक्षात ठेवावे.

मन चंचल असले तरी त्याची चंचल गती पूर्ण अवरुद्ध करता नाही आली तरी वरील ३ उपायांनी ती क्षीण करता येते व सर्वसामान्य जनतेस एवढे पुरे आहे.

संत ज्ञानेश्वरांनीही पसायदानात ''ते खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूता परस्परे पडो। मैत्र जीवाचे।।'' हे सांगून दुष्टांचे मन पालटून ते सत्कर्मी रमोत हे सांगितले आहे वा इच्छिले आहे.

तेव्हा अथांग, अगोचर, अगाध, अतीबलाढ्य, अनिर्बंध मनावर उपासना, सत्‌संग, सत्‌सहवास व सद्‌गुरुकृपेने नियंत्रण ठेवून मन प्रसन्न आनंदी ठेवून जीवन जगावे हे जनसामान्याचे विहीत कर्म व्हावे तरच मानवी जीवन आनंदी समाधानी सुखी होईल व ''आनंदाचे डोही आनंद तरंग'' अनुभवता येतील. इत्यलम्.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

हलवून खुंटा बळकट करणे. खांब पुरतांना तो हलवून हलवून मग पक्का घट्ट बसवावा लागतो.

सर्व बाबतीत बारकाईने मेहनत करणे जरुरी असते.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

(मागील अंकापासून लेखाचा उर्वरित भाग..... )

''इमं विवस्वते योगं प्रोक्तवान् अहम् अव्ययम्। विवस्वान् मनवे प्राह। मनुर इक्ष्वाक्वेऽ फवीत् । इक्ष्वाकुणाच कथितः प्राप्य लोकान् व्यवस्थितः।'' आगमाची परंपरा अशा रीतीने सूर्यापासून सूर्यवंशाच्या राज घराण्यात आली असा प्राचीन दाखला आहे. पण प्रत्यक्ष मूर्तिमंदिरांचा उद्‌गम आणि विकास श्रीकृष्णापासून दिसतो. म्हणजे चंद्रवंशी राजघराणे यदु किंवा वृष्णी या घराण्यात पांचरात्र आगम प्रचलित असावा. कृष्णाने त्याला मोठी चालना दिली असावी. संकर्षण हा मोठा भाऊ असला तरी सैद्धान्तिक दृष्ट्या पांचरात्र तत्त्वज्ञानाचा गाभा चतुर्व्यूह हा आहे आणि त्यात वासुदेव संकर्षण प्रद्युम्न अनिरुद्ध ही परंपरा आहे. श्रीकृष्ण हा विष्णूचा अवतार म्हणून द्वापरयुगात मान्यता पावला होता आणि बलरामाला याची जाणीव होती. म्हणून त्याने सात्वत विधीप्रमाणे त्याची पहिली पूजा केली. शिशुपालाने या गोष्टीला विरोध केला म्हणून त्याचा नाश झाला.

पांचरात्र आगमाची सुरुवात काश्मीरमध्ये झाली असे इतिहासकारही सांगतात आणि रामानुजाचार्यांचे गुरु यामुनाचार्य यांनी पांचरात्र आगमाचे दक्षिणेतील स्थान बळकट करण्यासाठी अगमप्रामाण्य हा ग्रंथ लिहिला आणि त्याच पांचरात्राची ओळख काश्मीरागम अशीच करून दिली आहे. देशभर विशेषतः दक्षिणेत निगम संस्कृतीची पाळेमुळे खोल रुजलेली असताना यज्ञपात्रांची परंपरा डावलून मंदिरांतर्गत मूर्तिपूजेची परंपरा रुजवणे कठीण असावे. त्या काळात (सु. १० वे शतक) यामुनाचार्यांनी कौशल्याने आगमांसाठी वेदतुल्य प्रामाण्य हा तोडगा काढला. त्यामुळेच Van Buitenen या डच आगमसंशोधकाने त्याना पांचरात्रिक नैय्यायिक ही पदवी बहाल केली असावी.

एफ ऑटो श्राडर या थिऑसॉफिकल सोसायटीच्या महापण्डितांनी पांचरात्र संहितांचा कालनिर्णय ठरवण्याचा महाउपक्रम केला. त्यासाठी त्यानी स्पंदप्रदीपिकाकार उत्पलाचार्यांचा आधार घेतला (इ.स.९००). हे मूळचे शैवपडित नंतर वैष्णव झाले व त्यानी उत्पलवैष्णव हे बिरुद लावले. डॉ. श्राडरनी Terminus ad quem असा शब्दप्रयोग करुन इ.स.८००च्या पूर्वी आणि इ.स. २०० नंतर म्हणजे ३ रे शत यात पांचरात्र संहितांचा रचनाकाल ठरवला. यातील रत्नमय किंवा अभिजात Classical संहिता म्हणजे सात्वत–पौष्कर–जयाख्य यातील जयाख्य संहितेचा काळ संपादक बिनयतोष भट्टाचार्यांनी दोन कसोट्या लावून इ.स. पांचवे शतक ठरवला आहे आणि श्राडरनी अहिरबुध्य संहितेचा काळदेखील ५ वे शतक ठरवला आहे. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्यानी 'Introduction to Pancharatna and Ahirbudhnya

Samhita' हा ग्रंथ जर्मन नागरिक म्हणून पहिल्या महायुद्धाच्या काळात अहमदनगरच्या तुरुंगात बंदीवासात लिहिला. त्यानंतर तीस वर्षांनी त्याच तुरुंगात पं. नेहरुंनी Discovery of India हा ग्रंथ लिहिला. श्राडरसारख्या महामंडिताची दखल कोण घेतो? याचे उत्तर असे. मेलकोटे (कर्णाटक) येथील रामानुजमठाचे मठाधिपति यतिराज स्वामी यांनी पांचरात्राच्या वेचक संहिताचे संपादन प्रकाशन केले. त्यांनी त्यांच्या तरुणपणी पांचरात्रातील काही शंका विचारणारे एक पत्र श्राडरना लिहिले. (अं.१९६२). त्याला त्यानी एका पोष्टकार्डावर उत्तर पाठवले. त्यात त्यांनी लिहिले होते. 'I find my meals once in 2 days with difficulty.' हे पत्र दाखवताना स्वामिजींच्या डोळ्यात पाणी उभे रहात असे.

आता संशोधकाच्या दृष्टीने श्राडर आणि यामुनाचार्यांनी काश्मीर हा उगमप्रदेश म्हटले हे ठीकच. गीतेच्या एका ओळीत सनातनः शाश्वत धर्मगोप्ता। असे म्हटले आहे. भांडारकर संस्थेच्या मुद्रित प्रतीत नेमका यांचा पाठभेद – सात्वत धर्मगोप्ता असा काश्मीर Recension मध्ये आहे. त्यामुळे सात्वतधर्माचा काश्मीरशी संबंध पक्का होतो.

तथापि संशोधकाला सावध असावे लागते. सात्वतसंहितेच्या कांची Edition १९०२ मधल्या १ ल्या शास्त्रावतरणाच्या श्लोकात परशुरामानी नारदाला आदेश दिला की, 'काही मुनी मलय पर्वतावर तप करीत आहेत. त्यांना सात्वत क्रियामार्ग समजावून सांग.'

'मुनयो मलयाचले। तान् सात्वते क्रियामार्गे मद्वाक्याद् याहि योजय।' आता मलयपर्वत तर पार दक्षिणेला मेलकोटे जवळ आणि मेलकोटे म्हणजे यदुशैल वा यादवाद्रि। आणि आजही सात्वत संहिता तिथल्या पूजाविधीची सार्वभौम आहे. सात्वतं यदुशैलेन्द्रे साम्राज्यम् अधितिष्ठति।

असा त्रेता युगापासून कलियुगापर्यंतचा आगमाचा प्रवास सांगितला. सात्वत संहितेच्या सुरुवातीला, 'सत्ययुग संपून त्रेतायुग सुरु होत आहे. त्यामुळे सात्वत् क्रियामार्ग युगानुकूल आहे' असे वर्णन आले आहे.

आता या आगमाची रचना आणि त्यातील विषय पाहू. ज्ञान योग क्रिया चर्या अशी चतुष्पाद रचना अभिप्रेत आहे. पांचरात्राची कालक्रमाने शेवटची पाद्मसंहिता (इ.स.८००). यात ज्ञानपाद योगपाद क्रियापाद आणि चर्यापाद हे चार पाद आहेत. ज्ञानपाद (अ.१-१२) यांत तत्वज्ञानाचे विषय म्हणजे जीव, ईश्वर, विश्व, मोक्ष इ. आले आहेत.

पाद्मसंहिता ही विष्णुकांचीच्या वरदराज विष्णूच्या मंदिराची कार्यकारी संहिता आहे. त्या देवळाचा सार्वभौम ग्रंथ म्हणजे जयाख्यसंहिता. (इ.स.५वे शतक). त्यासोबत एक अधिकःपाठः छापला गेला आहे. तो वास्तविक पाद्यसंहितेचा भाग आहे. त्यात ब्रह्मदेवाने हस्तिगिरीवर म्हणजे आज वरदराजाचे मंदिर ज्या हत्तीच्या आकाराच्या शिळेवर उभे आहे. त्या जागी यज्ञ केला

आणि अश्वबली दिला. त्याची वपा म्हणजे काळजाचा पापुद्रा तोंडात पकडून विष्णु अग्नीतून प्रगट झाला आणि त्याने ब्रह्माची स्तुती केली. त्याला ती फार आवडली. वपा तव इयं मधुरा मम प्रीतीकरी सदा। निगम परंपरेत देखील आहुती स्वीकारणाऱ्या देवांचे वर्णन असे नसावे. वैष्णवांच्या शाकाहारात तर ते कुठेच बसत नाही. पण हस्तिशैल मंदिराची उभारणी या घटनेवर आधारलेली आहे. तात्पर्य आगमानुसार जी ४ स्वयंव्यक्त मंदिरे प्रगटली त्यातले हे दक्षिणेतले चौथे आणि तामिळनाडूतले दुसरे आहे. इथे जयाख्य संहिता साम्राज्यम् अधितिष्ठति आणि पाद्मसंहिता कार्यकारी प्रचार्यते (Executive manual). यज्ञ संस्कृतीचा प्रभाव आगम परंपरेतील मंदिर निर्मितीशी जाऊन भिडतो.

दुसऱ्या योगपादात (अ.१ ते ५) स्थूलमानाने अष्टांग योग विषय ३क्रियापाद (१९अध्याय) यात मंदिर स्थापत्य मूर्तिशिल्प आणि प्राकारशिल्प इ. विषय आणि ४ चर्यापादात मंदिरान्तर्गत नित्य नैमित्तिक काम्य पूजा आराधना Enshrined Image worship round the clock & round the year आणि उत्सव व तीर्थयात्रा इ. विषय येतात.

Daniel Smith नावाच्या अमेरिकन संशोधकांनी Pancharatra Bibliography हा ज्ञानकोशात्मक ग्रंथ लिहिला. त्यात ३० संहितांचा विषय सारांश दिला आहे आणि Vaishava Iconography या ग्रंथात मूर्तिशास्त्र दिले आहे. ही पुस्तके Gaekwad Oriental Institute ने प्रसिद्ध केली. Dr. Lakshmi Narasinhan यांचा Vaikhanasa Iconography हा ग्रंथ अनन्ताचार्य इन्स्टिट्यूट (कफपरेड मुंबई ५) यांनी प्रसिद्ध केला आहे.

आगमात्मक हिंदु धर्माचा समाज मनावर जसजसा प्रभाव वाढत चालला तसतसा निगमात्मक प्रवाह क्षीण होत चालला. तरीदेखील मध्ययुगात तेराव्या शतकापर्यंत आगम धर्माला समाजात रक्षणकर्त्यांची गरज होतच होती. त्यामुळे रामानुजसंप्रदायाचे एक प्रमुख आचार्य वेदान्त देशिकांना पांचरात्र रक्षा हा ग्रंथ लिहावा लागला. ते स्वतःला वेदान्तदेशिक म्हणजे निगमान्तदेशिक असे म्हणवीत. आगमाना वेदांशी संबंध ठेवणे अनिवार्य होते. त्यामुळे एकायनवेद, मूलवेद असे शब्दप्रयोग मुद्दाम योजल्यासारखे वाटते. व्यासानी वेदांचे विभाजन करण्यापूर्वी एकायन किंवा मूलवेद हाच होता आणि तो एकच एक विष्णूची उपासना सांगणारा होता वगैरे पुस्त्या जोडल्या गेल्या. वेदांच्या जशा आधी तीन आणि नंतर ४ शाखा झाल्या. तशा मूलवेदाच्या सात्वत पौष्कर जयारव्य अशा शाखा झाल्या वगैरे तर्क जोडले गेले. आगमांच्या काळांचे पण टप्पे पडले ते असे; आदिकाल आगमकाल आचार्यकाल आणि आधुनिक काल. आदिकाल म्हणजे त्रेता आणि द्वापर युगातील मूर्तिपूजेचा काळ २. आगमकाळात - संहितांची रचना ३. आचार्यकाळात टीका ग्रंथ. ४. सात्वतसंहिता आणि ईश्वर संहिता यावरील अळशिंग भाष्य इ. आधुनिक काळात.

देवळांची शासनाकडील नोंदणी,

दक्षिणेकडे हिंदुदेवादाय व धर्मादाय ही शासकीय खाती. Dept. of Hindu Religious and Charitable Endowments त्यासाठी स्वतंत्र मंत्री इ. तिरुपतीसारख्या देवस्थानासाठी Executive Officer म्हणून IAS अधिकारी तिरुपती देवस्थानची देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांच्याच ३०००/- कार आहेत. देवस्थानच्या हुंडीतील रोजची जमा कित्येक लाख आहे. श्रीरंगचे देऊळ एवढे विस्तीर्ण आणि उत्तुंग आहे की त्याला ७ प्रकार आणि ७ x ४ = २८ गोपूर म्हणजे towergates आहेत. त्या मंदिराने कावेरी नदीतील बेट पूर्ण व्यापले आहे. तिसऱ्या प्राकारापर्यंत मोठ्या tourist Bus सहज वावरतात. TVS Company त्याचा जीर्णोद्धार करण्याच्या कामी अब्जावधि रुपये खर्च करीत आहे. त्या कामी लागणारे स्थपति तयार करण्यासाठी TVS Shilp Vidya-Gurukulam त्यांनी सुरु केले आहे. ते कुंभकोणमला आहे. TVS कंपनीने कुंभकोणमला TVS शिल्प विद्या गुरुकुलम् सुरु केले आणि K P Vizinathan आणि Umapathy या दोन विश्वकर्मा कुलोत्पन्न स्थपतिबंधूंना संचालक नेमले आहे.

उत्तरेकडे दिल्लीला यमुनातीरावर अक्षरधाम नावाचे स्वामिनारायण मंदिर १०० एकर जागेवर उभे आहे. त्याची आकडेवारी प्रवेशद्वाराजवळ संगमरवरात कोरली आहे. त्यात ३० कोटी तास एवढी भक्तांनी करसेवा रुजू केली अशी नोंद आहे. यासाठी सोमपुरा स्थपती ज्ञातीतील ५,०००/- तरुण मुलांना कुशल कारागिरीसाठी अन्यत्र गेलेल्या क्षेत्रातून परत आणून training देऊन Genetic skill revival चा प्रयोग प. पू. प्रमुख स्वामि महाराजांनी करून दाखवला आणि तोच प्रयोग द्राविडी स्थापत्याच्या बाबती यशस्वी होत आहे.

आगम आणि शिल्प यांचा परस्पर संबंध काय? आगमाचार्य कोणत्या देवाचे देऊळ कशा संकेताने बांधायचे हे सांगणार आणि स्थपति शिल्पशास्त्राप्रमाणे ते साकारणार. आगमांसाठी सूचना शिल्पशास्त्रविधानेन कुर्यात्। आणि शिल्पकारांसाठी सूचना आगमोक्तविधानेन कुर्यात्। शिवाच्या मूर्तीसमोर नंदी आणि विष्णूच्या समोर गरुड. पण त्या मूर्ती घडवायचे तंत्र शिल्पशास्त्रावर विसंबून. पौष्करसंहितेत (अं.३००A.D.) एक संपूर्ण प्रकरण सैद्ध देवालय असे आहे. त्यात एकादा सिद्धपुरुष एकाच गावाच्या माळावर एखाद्या चौथऱ्यावर बसतो आणि ध्यानावस्थेत त्याला तिथे देवाची मूर्ती होती असे दिसते. त्याच्याभोवती जमलेल्या भक्तांना तो सांगतो विश्वकर्म कुलोद्भूत अशा स्थपतीला बोलवून आणा. असा स्थपती आल्यावर तो त्या मूर्तीचे वर्णन करून सांगतो ही फार बाळबोध प्रक्रिया झाली. पौष्करसंहिता म्हणते, 'तो सिद्धपुरुष त्याने ध्यानावस्थेत पाहिलेले देवतेचे स्वरुप स्थपतीच्या बुद्धिरुपी आरशांत संक्रमित करतो. स्थपतेः बुद्धिदर्पणे संक्रांतं करोति।' म्हणजे त्या काळचे What's app तंत्र. यात भाषण मनन हे माध्यम नाही.

पौष्कर संहितेच्या या भागाचा अनुवाद

करताना मी थेट पद्मविभूषण (नंतरचे) गणपती स्थपतींकडे पोचलो. आणि हे श्लोक वाचून दाखवले. त्यांनी त्याचे छान विवरण केले. अध्यायाच्या शेवटी असे म्हटले आहे की तो स्थपती सिद्धपुरुषाच्या प्रभावाने हुबेहुब तशी मूर्ती बनवतो. म्हणून विश्वकर्मा स्थपतीचे ऋण समाजाने मानले पाहिजे. आता आगमविधि. त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा समजा २०० वर्षापूर्वी झाली. १०० वर्षे मंत्रोच्यारानी त्या मूर्तीतील दैवी ऊर्जा वाढत गेली. पुढे ती मूर्ती कोणीतरी उखडून टाकली. तर ज्यावेळी पीठापासून ती मूर्ती उखडली जाते त्यावेळी त्या मूर्तीच्या खाली एकसंध शिळेची खुंटी असते ती पीठाच्या विवरांत बसवलेली असते. त्या विवराला ब्रह्मविवर म्हणतात. त्या ब्रह्मविवरांत त्या मूर्तीतील ऊर्जा संचित होते. नव्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली की मन्त्रोच्यारांनी प्रतिदिन त्या मूर्तीत दैवी ऊर्जा संचित होते. मात्र ती ऊर्जा आधीच्या संचित ऊर्जेत भर टाकीत जाते. बँकेत जशी संचित ठेव असते. ती नूतनीकरणानंतर नव्या व्याजाची भर पडून वाढत जाते तद्वत्.

आता निगम संस्कृतीतून आगम संस्कृतीत परिवर्तन होताना. आगमाच्या समाजहितेच्छू ऋषींनी निगमात्मक धर्माची नाळ तुटू दिली नाही. त्यांनी एक चतुःस्थानार्चन नावाची संरचना मांडली. त्यानुसार एकाच देवाचे आवाहन मंदिरात चार स्थानी केले जाते. आगमाप्रमाणे १ मूर्तीमध्ये (विम्बे) २ कुम्भामध्ये (कुंभे) म्हणजे सत्यनारायणाच्या पूजेची परंपरा ३ मण्डलामध्ये म्हणजे आकृतीमध्ये म्हणजे श्रीयन्त्र वगैरे मध्ये. आणि ४ अग्निकुण्डामध्ये.

आता यासाठी मंदिरात कायम स्वरुपी होमशाळा आली. त्यासाठी यज्ञप्रक्रिया आली वेदमंत्र आले. याखेरीज आगमांनी एक मानसपूजाविधी नावाची नवी भर टाकली.

वेदांप्रमाणेच भारतात तंत्रमार्गोपासना पण खूप प्राचीन आहे. त्यांनाही आगमांनी विशेषतः शैव वैष्णव या दोघांना सामावून घेतले; पण वामाचार टाळून दक्षिणाचार म्हणजे मंडल, मन्त्र आणि मुद्रा यांचा वापर करून तसेच वेद तन्त्र उभयोद्भूतैः मन्त्रैः। म्हणजे वेदमन्त्राबरोबर श्री. ऱ्हीं क्लीं इ. मन्त्रांनी आणि त्याला पुरवणी जोडली नाम मन्त्रांची. पंचाक्षरी म्हणजे नमः शिवाय, षडक्षरी म्हणजे ॐ विष्णवे नमः। अष्टाक्षर म्हणजे ॐ नमो नारायणाय। आणि द्वादशाक्षर म्हणजे ॐ नमो भगवते वासुदेवाय।

**वैष्णवागमात दोन भाग आहेतः वैखानस आणि पांचरात्र**

वैखानस ऋषींनी यज्ञ प्रक्रियेच्या जागी मंदिरान्तर्गत मूर्तीपूजेची प्रक्रिया चपखल बसवली. मात्र १०० टक्के वैदिक मन्त्रांचा विनियोग करून. वैखानस आगमकोश ११ खंड तिरुपती राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठद्वारा प्रकाशित संदर्भग्रंथ याविषयासाठी उपयुक्त आहे.

शैवागमासाठी स्वतंत्र लेख लिहावा लागेल. इथे इतकेच पुरे की पाद्म संहितेत

जसे ४ पाद आहेत. तसे शैव मृगेंद्रागमामध्ये विद्यापाद योगपाद क्रियापाद चर्यापाद आहेत. विष्णुऐवजी शिव ही मूर्ती. बाकी आलय निर्माण तसेच शिल्पशास्त्रविधानेन करायचे. पाँडेचरीच्या फ्रेंच इन्स्टिट्यूटने शैवागम आणि शिल्पशास्त्राचे खूप ग्रंथ प्रकाशित केले. फिलिओझ्ा पितापुत्र आणि Dr. N. R. Bhatt, Brano Dagens, Jean De. Loche अशा अनेक संशोधकांची तपस्या या प्रकाशनामागे आहे.

आगमधर्म संस्कृतीचा प्रसार मंदिरांद्वारा मूर्तिमंत उभा आहे. विश्वातील सर्व खंडामध्ये मंदिरनिर्मिती चालू आहे. रोज जगात कोणत्यातरी वेळी कोणत्या तरी स्थळी एखाद्या मंदिराचे भूमिपूजन, जीर्णोद्धार, कलशपूजन इ. सतत चालू आहे. द्वापरस्य युगस्यान्ते आदौ कलियुगस्यच आणि ज्या धर्माचा प्रवर्तक नारायणः स्वयम् होता तो धर्म जगभर उत्तुंग कलनिशी तळपत आहे आणि आगम संस्कृतीवर सूर्य कधीच मावळत नाही.

**डॉ. प्रभाकर आपटे**
बुद्धदेव विहार, हिलगार्डन,
टिकुजीनीवाडी जवळ,
ठाणे – ४००६१०
भ्रमणध्वनी : ७०२१७७६५१५

●●●

(पृष्ठ क्र.६ वरून... **गीतकृष्णायन**)

कोणत्या उपायानं ते साध्य होईल असं तुला वाटतं कृष्णा? धर्मराज विचारता झाला.

कौरवांच्या बाजूनं लढणारा त्यांचा पुत्र अश्वत्थामा...

पण तो तर अवध्य आहे! भीम कृष्णाचं वाक्य पूर्ण होण्याच्या आत बोलला.

पण त्याला काही उपायानं द्रोणांच्या दृष्टिआड करवलं, अश्वत्थामा नामक हत्ती ठार केला आणि 'अश्वत्थामा मेला' अशी बातमी द्रोणांपर्यंत गेली तर आपला हेतू साध्य होऊ शकतो. कृष्ण ठामपणे म्हणाला.

तसंच झालं! ती बातमी रणांगणी कानावर येताच लढत असलेल्या द्रोणांनी उद्वेगानं युधिष्ठिराला विचारलं, अश्वत्थामा चिरंजीव आहे. तो मरणं शक्य नाही! धर्मा, कालत्रयी तू तरी असत्य बोलणार नाहीस म्हणून तुला विचारतो, काय अश्वत्थामा खरंच वधला गेला? ...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

## सुभाषित-कथा
## मित्रभेद

श्रीकांत अनंत बर्वे

मागील अंकात उल्लेख केलेल्या पंचतंत्र नावाच्या ग्रंथातील 'मित्रभेद' नावाच्या तंत्रातील ही कथा या अंकात देत आहे. ज्याचे कुलशील ठाऊक नाही अशा व्यक्तीला आश्रय देऊ नये हे तत्व 'ढेकूण' आणि 'ऊ' यांच्या कथेतून मांडले आहे तो श्लोक असा–

**नह्यविज्ञातशीलस्य प्रदातव्यः प्रतिश्रयः**
**मत्कुणस्य हि दोषेण हता मन्दविसर्पिणी।।**

कोण्या एका राजाच्या प्रसादात अतिशय उत्तम असा त्याचा शयनकक्ष होता. पलंगावरील गादीवर घातलेल्या पांढऱ्या शुभ्र चादरीच्या कोपऱ्यावरील घडीत 'मन्दविसर्पिणी' नावाची 'ऊ' रहात होती. एके दिवशी फिरत फिरत 'अग्निमुख' नावाचा एक ढेकूण तेथे आला. त्याला पहाताच चिंताग्रस्त झालेली मंदविसर्पिणी त्याला म्हणाली – ''हे अग्निमुखा, या अयोग्य स्थानी तू कोठून, कशासाठी आला आहेस?' तुला कोणी पहात नाही. ओरडत नाही तेवढ्यातच तू येथून निघून जा! तेव्हा प्रत्युत्तरादाखल अग्निमुख तिला म्हणाला – घरी आलेल्या दुर्जनाशीही अशा तऱ्हेने कोणी बोलत नाहीत. (बोलू नये) उलटपक्षी स्मृतीकारांनी म्हटले आहे की – 'यावे, बसावे, खूप दिवसांनी आपले दर्शन घडत आहे. आपली काय हाल–हवाल? (आपण खुशाल आहात ना?) आपल्या दर्शनाने आनंद झाला. घरी आलेल्या नीच माणसाशीही असे आदरपूर्वक बोलावे. हाच सुगृहिणीचा धर्म आहे.

आणि दुसरे असे की – आहारदोषांमुळे अनेक माणसांच्या शरीरातील – कटु (तिखट) कषाय (तुरट) आम्ल (आंबट) अशा रसांचे सेवन मी त्यांच्या रक्ताद्वारे केले आहे. पण आजपर्यंत कधीच मी मधुर रक्ताचा आस्वाद घेतला नाही. जर अतिथी रूपाने तुझ्याकडे आलेल्या माझ्यावर कृपा केलीस तर विविध प्रकारच्या सुंदर आहारामुळे ज्याचे रक्त अतिशय मधुर आहे त्यांच्या रक्ताच्या आस्वादाने मी सुखी होईन. समाधानी होईन! व त्यासाठीच भुकेने त्रस्त अशा मला सुमधुर अशा रक्ताचा आस्वाद घेऊ दे!

हे ऐकून ती ऊ ढेकणास म्हणाली – तुला जर खरेच महाराजांचे मधुर रक्त प्यायचे असेल तर थोडा वेळ थांब. जोवर मी राजाचे रक्त सेवन करीत नाही तोवर धीर धर. असा त्या दोघांचा संवाद चालू होता तेवढ्यात राजा तेथे आला. मंचावर लवंडला. लगेचच तोंडाला पाणी सुटलेल्या अग्निमुखाने राजा झोपण्यापूर्वीच त्याला दंश केला. त्यामुळे सुई टोचल्याप्रमाणे वेदना झालेला राजा बिछान्यावरून उठला आणि त्याने सेवकांना आज्ञा केली – 'या चादरीवर एखादा ढेकूण किंवा ऊ आहे का याचा शोध घ्या. राजाज्ञेप्रमाणे शोध घेण्यासाठी सेवकांनी गादीवरील चादर काढण्यास प्रारंभ केला. तेव्हा

(पृष्ठ २९ वर)

वेदांमध्ये वास्तोष्पतीसूक्त आहे; त्यात सर्व वास्तूंना व्यापणाऱ्या वास्तुदेवतेची प्रार्थना आहे. त्या सूक्तात 'अमीवहा वास्तोष्पते विश्वारूपाणि आवह' म्हणजे 'हे वास्तूच्या रक्षणकर्त्या देवा, तू सर्व प्रकारची रूपे धारण कर आणि आमचे रक्षण कर', असे म्हटले आहे. त्या सूक्ताचा ऋषी पुढे असे म्हणतो की वास्तूसंबंधीच्या आमच्या सर्व हालचालींच्या वेळी; म्हणजे प्रवेश करताना, बाहेर पडताना, वास्तूचे स्थलांतर करताना अशा सर्व वेळी तूं आमचा त्राता हो. वास्तूला पालक असतो आणि तो जागृत असतो ही कल्पना वेद कालापासून आहे. परंतु काळाच्या ओघात या संकल्पनेला एक मूर्त स्वरूप आपल्या पूर्वजांनी दिले. त्याचे नाव वास्तुमंडल. आज सर्वत्र वास्तुसंबंधीच्या पुस्तकांत वास्तुमंडलाचे चित्र असतेच. या मंडलाकृतीचा इतिहास समजून घेण्याजोगा आहे.

वास्तुशास्त्रावरील ग्रंथांत वास्तुमंडल आणि पदविन्यास असे दोन शब्द रूढ आहेत. पद म्हणजे वास्तुमंडलातील एक चौकोन किंवा कोष्ठ किंवा घर. वास्तुशास्त्रातील मयमत, मानसार या ग्रंथांत १ x १ = १ ते ३२ x ३२ = १०२४ इतक्या घरांच्या वास्तुमंडलाच्या आकृत्या दिल्या आहेत. पौष्कर संहिता नावाच्या वैष्णवागमाच्या संहितेत या मंडलांचे वर्णन 'छायोत्थः यः पुनर्विप्र विश्वरूपस्य वै विभोः' असे केले आहे. त्यानुसार विश्वव्यापी परमतत्त्वाचे प्रतिबिंब म्हणजे वास्तुमंडल. इंग्रजीत 'Macrocosam reflected into Microcosam' असे याचे समर्पक वर्णन आहे. पुराणसाहित्यात मत्स्यपुराणाने वास्तुमंडलाची आकृती कशी काढावी त्याची कृती दिली आहे आणि त्यानंतर प्रसिद्ध ज्योतिष ग्रंथ म्हणजे वराह मिहिराची बृहत्संहिता यात वास्तुमण्डल रेखाटनाची कृती दिली आहे. त्यात उभ्या आडव्या आणि तिरक्या रेषांचा वापर आहे.

भूमितीच्या भाषेत Anatomy of Vastupurusha sketched on geometrical diagram असे याचे वर्णन आहे. इ. सनाच्या पाचव्या शतका आगेमागे ही मंडलाकृती आणि त्यात वास करणाऱ्या देवतांची ४५ संख्या पण निश्चित झाली असे दिसते. परंतु पौष्कर संहितेत प्रथमच (इ.स. ३०० च्या सुमारास) या देवतांची स्थापना 'नागकुण्डलवत् दक्षिणावर्तकेनच' म्हणजे नागाच्या वेटोळ्याप्रमाणे उजव्या क्रमाने किंवा clock-wise अशी सूचना दिली आहे. या देवतांना व्यापण्यासाठी जी घरांची संख्या दिली आहे तीनुसार 'एकपदिक-द्विपदिक-त्रिपदिक-षट्पदिक ही पूर्णांकाची नावे आणि 'अर्धपदिक' 'सार्धपदिक' म्हणजे १/२, ३/२, दीड घरांचीही वाटणी केली आहे.

ह्या सगळ्या वास्तुदेवतांना देवता म्हणणे देखील धाडसाचे आहे. उदाहरणार्थ 'रोग' ही देवता आहे. पापयक्ष्मा म्हणजे क्षयरोग ही सुद्धा देवता आहे. राजा भोजाने

वास्तुमंडलांचे बहुरूपी वर्णन करताना त्रिकोणी, पंचकोनी, गोल अशाही आकृत्या दिल्या आहेत आणि महाराजप्रासादाचे वर्णन करताना वरुण देवतेच्या ठिकाणी राजवाड्याची विहीर, यमदेवतेच्या ठिकाणी गुप्तधन, गंधर्वाच्या ठिकाणी नाट्यगृह, पुष्पदंताच्या जागी फुलवाडी, धर्माच्या ठिकाणी न्यायालय अशी समर्पक वास्तुयोजना केली आहे. वास्तूच्या काही ग्रंथांत वास्तुमंडलाच्या देवतांना रंगही सांगितले आहेत आणि वास्तूपुजेच्या वेळी वेगवेगळ्या देवतांना त्यांच्या आवडीचे नैवेद्यही सांगितले आहेत. वास्तुपुरुषमंडल हा शब्दप्रयोग प्रथम स्टेला क्रॅमरिश या जर्मन विदुषींनी १९४६ साली हिंदू टेंपल या त्यांच्या ग्रंथात वापरला असे दिसते. त्या आधी वास्तुपुरुष आणि वास्तुमंडल हे शब्द स्वतंत्रपणे वापरात होते. पौष्कर संहिता या ग्रंथाचा अपवाद वगळता सर्व वास्तुमंडलाकृतींमध्ये केंद्रस्थान ब्रह्मा या देवतेला दिलेले असते, आणि गृहरचना किंवा नगररचना यांमध्ये ती जागा रिकामी ठेवतात. राजा भोजाने त्याठिकाणी इंद्रध्वज नावाचा राजध्वज प्रतिष्ठित केला. चतुःशाल गृहरचना म्हणजे चौसोपी वाडा यात देखील मधली जागा मोकळीच असते. पौष्कर संहितेने वास्तुमंडलाकृतीत मध्यस्थान विश्वरूप या देवतेला अर्पण केले आहे आणि चार कोपऱ्यातील चार चौकोन चतुर्मुख ब्रह्मदेवाला दिले आहेत. या संहितेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे तीत चारही दिशांचे चार कोपरे चतुर्दलकमलांनी सुशोभित केले असून बाकी सर्व चौकोनांत ९ x ९ = ८१ - ४ = ७७ अष्टदल कमलांची योजना केली आहे. सामान्यतः वास्तुमंडलातील चौकोनात कोणत्याही आकृत्या असत नाहीत.

मय, विश्वकर्मा या परंपरागत वास्तुग्रंथकर्त्यांनी ४५ वास्तुदेवतांची संख्या स्थिर ठेवून त्यांना व्यापणाऱ्या वास्तुमंडलाच्या घरांची संख्या एका चौकोनापासून १०२४ चौकोनापर्यंत वाढवलेली आहे. राजा भोजाने या आकृत्यांसंबंधी त्यांचे वास्तुपुरुषाचे नाते समर्पक शब्दात मांडले आहे ते असे 'एक एव पुमान् एषु बहुधा संव्यवस्थितः।' म्हणजेच मंडलाकृती कुठल्याही आकाराची किंवा कुठल्याही मापाची असली, तरी त्या आकृतीला वास्तुपुरुषाचे चैतन्य व्यापून राहते. म्हणजेच एखादा प्लॉट-भूखंड वेडावाकडा जरी असला तरी वास्तुपुरुष त्याच्या सांदी कोपऱ्यापर्यंत व्यापून राहत नाही असे होत नाही. थोडक्यात, वास्तुपुरुष मंडलाचे आणि त्यावर साम्राज्य गाजवणाऱ्या वास्तुदेवतेच्या चैतन्याचे असे हे अतूट नात आहे.

समरांगण सूत्रधारात अष्टांग आयुर्वेदाप्रमाणे किंवा अष्टांग योगाप्रमाणे अष्टांग स्थापत्याची कल्पना मांडली आहे. त्याचे पहिले अंग म्हणजे वास्तुपुरुषाची मंडलाकृती मांडणीः 'वास्तुपुंसो विकल्पना'. आणि नंतर राजा भोजाने पुरनिवेश इत्यादी तीन प्रकारच्या वास्तूंसाठी तीन प्रकारची पदविन्यासरचना सांगितली आहे, आणि त्यानंतर पुढच्या जवळजवळ ७० अध्यायात वास्तुपुरुष मंडलाचा स्थलालेख किंवा तलच्छंद म्हणजेच Ground plan हा masterplan प्रमाणे वापरला

आहे. साहजिकच घोड्याचा तबेला, हत्तीखाना यासाठीदेखील वास्तुमंडलाचा स्थला लेख म्हणून अनिवार्य उपयोग केला आहे. हा झाला वास्तुमंडलाकृतीचा द्विमिती म्हणजे two dimensional व्यावहारिक उपयोग. बहुमजली इमारतीत प्रत्येक मजल्यावर वास्तुमंडलाचे आरेखन हवेच असते. अशा अर्थाने भोजाचे वचन 'एकच वास्तुपुरुष अनेक प्रकाराने प्रकट होणाऱ्या इमारतींमध्ये व्यापून राहिलेला असतो' हे स्थापत्य तंत्रज्ञानाचे शाश्वत तत्त्वच सांगते.

भोजाच्या स्थापत्यामध्ये प्रासाद म्हणजे मंदिर रचना हे एक अंग आहे आणि मंदिर स्थापत्याचा सखोल विचार आगम ग्रंथात सापडतो. पौष्कर संहिता या इ. स. ३०० च्या काळातील ग्रंथात वास्तुपुरुष मंडलाची आरेखन पद्धती प्रथम आली आहे हे आपण पाहिले आहे. त्या ग्रंथात वास्तुमंडलाखेरीज इतर चार प्रकारचे मंडलसमूह दिले आहेत. त्यातील पद्मोदर म्हणजे ज्याच्या मध्यभागी कमळ असते अशा मंडलांचा एक गट आहे. त्यातील पहिली चार मंडले : सर्वतोभद्र, अघनिर्मोचन, सदध्व आणि धर्माख्य अशी आहेत. या मंडलांचा स्थलालेख म्हणून उपयोग करून त्यावर त्रिमिती म्हणजे three dimensional गाभाऱ्यांची निर्मिती झाली असल्याचा पुरावा इ.स. ७०० च्या काळातील पारमेश्वर संहिता या पौष्कर संहितेवरील भाष्यग्रंथात आला आहे, आणि त्यात विद्यमान श्रीरंगमच्या मंदिरावरील सर्वात बाहेरच्या आकारावर सर्वतोभद्र, अघनिर्मोचन सदध्व आणि धर्माख्य या शाला आहेत असे नमूद केले आहे. अर्थात हा संशोधनाचा विषय आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी बंगलोरच्या एस. के. रामचंद्र राव यांनी त्यांच्या Mandalas and temple architecture या ग्रंथात हाच मुद्दा मांडला आहे. बौद्ध संस्कृतीत वज्रयान नावाचा एक संप्रदाय आहे. त्याच्या प्रभावामुळे बौद्धांच्या अनेक मठांत -सिक्कीम इत्यादी ठिकाणी मंडलाच्या मोठमोठ्या रंगीत कलाकृती चितारलेल्या दिसतात. मंडलरचनेच्या कलेचा विकास तिबेटमध्ये झालेला दिसतो. प्राचीन तिबेटी बुद्ध आचार्यांना महामंडलाचार्य अशी पदवी दिली जात असे. गेल्या शतकात तिबेटचे धर्मगुरू आणि विद्यमान दलाई लामांचे गुरू पंचेन लामा चीनच्या भेटीस गेले असताना त्यांच्या स्वागतासाठी एका विस्तीर्ण मंडलाची रचना केली होती. त्याचे चित्र गुइसेप टुची या इटालियन लेखकाच्या मंडल या पुस्तकात दिले आहे. या सर्व परंपरेवर सखोल संशोधन करून गेरी मलान्द्रा या अमेरिकन विदुषीने 'unfolding of a mandala : Ellora Buddhist cave temples' असा ग्रंथ पंचवीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला. त्यात त्या विदुषीने असा सिद्धांत मांडला आहे की वेरूळ येथील बौद्ध धर्माच्या सहा गुंफा म्हणजे बौद्ध मंडलाकृतीला तलच्छंद म्हणजे ground plan असे मानून त्यावर वरवर चढत जाणाऱ्या वर्तुळाकार रस्त्यावर एकेका परिघावर एकेक मंदिर उभे करून त्यात बुद्धाच्या विविध मूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे. साहजिकच एखादा वर्तुळाकार जिना असावा आणि त्यावर छोट्या कोनाड्यात मूर्ती असाव्यात अशी कल्पना गेरी मलान्द्रा यांनी केली आणि ऐतिहासकदृष्ट्या सहाव्या,

सातव्या, आठव्या शतकामध्ये मंडलाचा एकेक परिघ म्हणजे तलच्छंद मानून ही लेणी घडवली गेली असा सिद्धांत त्यांनी मांडला. अशा तऱ्हेने मंडलाकृतींचा उपयोग मंदिरांच्या उभारणीसाठी झाला हा एकस्थापत्य तंत्रज्ञानाचा वेगळा पैलू म्हणून स्वीकारावा लागेल.

अशा तऱ्हेने वास्तुपुरुष मंडलाकृती आणि इतर वैष्णव आणि बौद्ध मंडलाकृतींचा विविध वास्तूंच्या निर्मितीसाठी होणारा उपयोग ऐतिहासिक आणि संशोधन विषयक दृष्टीकोनातून या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वकर्म्यांनें विश्वाची रचना करताना कदाचित अतिसूक्ष्म ते अतिस्थूल अशा मंडलाकृतींचा उपयोग केला असावा.

**– डॉ. प्रभाकर आपटे**
२/१४, दामोदर सोसायटी, बिबवेवाडी,
पुणे – ४११०३७.
दूरभाषा : (०२०) २४४१२३६७
मो. ९३२५५०९३२४

•••

## परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील

| Bank Name | Date | Particulars | Amount |
|---|---|---|---|
| SBI JKG | 09 May 2018 | BHALCH | 1,000.00 |
| SBI JKG | 18 May 2018 | 678723 | 375.00 |
| SBI JKG | 18 May 2018 | 650584 | 1,000.00 |
| SBI JKG | 21 May 2018 | ANIKET | 2,000.00 |
| SBI JKG | 21 May 2018 | NARAYAN | 1,000.00 |
| SBI JKG | 24 May 2018 | | 300.00 |
| SBI JKG | 25 June 2018 | | 247.00 |
| SBI JKG | 30 June 2018 | | 171.00 |
| SBI JKG | 21 July 2018 | PRABHU | 500.00 |
| SBI JKG | 25 July 2018 | MR MA | 1,000.00 |
| SBI JKG | 26 July 2018 | INI | 169.00 |
| SBI JKG | 02 August 2018 | CASH DEPOSIT SELF MUMUND | 325.00 |
| SBI JKG | 06 August 2018 | TR GCC FROM DATTATRAY RAJARAM | 500.00 |
| SBI JKG | 10 August 2018 | SYB BY CLEA 8157 | 450.00 |
| SBI JKG | 20 August 2018 | UPRCR | 300.00 |
| SBI JKG | 22 August 2018 | TR FROM DEVENDRS | 100.00 |
| SBI JKG | 05 September 2018 | PENDSE NEFT | 600.00 |
| SBI JKG | 22 September 2018 | TR FRM MPAS | 1,000.00 |
| TJSB | 25 April 2018 | cash orig brcd =23 | 1,000.00 |
| TJSB | 24 May 2018 | RMKR KHANDEKAR SHAM | 1,000.00 |
| TJSB | 18 June 2018 | GAJANAN KAPADI 62561 | 2,015.00 |
| TJSB | 17 July 2018 | SUDHAKAR VISHNU PANTKAMKA | 1,000.00 |
| TJSB | 20 August 2018 | cash orig brcd =19 | 2,000.00 |
| TJSB | 31 August 2018 | SHANTARAM KINNARKAR 373015 | 525.00 |
| TJSB | 3 September 2018 | SURENDRA GANESH | 525.00 |

वरील यादीत परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील दिला आहे. वरील तपशीलावरुन संदर्भ शोधता आला नाही. तरी संबंधित देणगीदारांनी कृपया संपर्क साधावा. प्रकाश दीक्षित– ९८१९६९३१९५ वा ९०८२९९०४३१. (Whatsapp)

## राजप्रणिधि अर्थात राजाचे दैनंदिन व्यवहार

डॉ. वैशाली जयंत दाबके

राज्याच्या सात प्रकृतींपैकी 'राजा' या आद्य आणि महत्त्वाच्या घटकाचा कौटिल्याने अतिशय विस्ताराने विचार केला आहे. अर्थशास्त्राचे प्रथम अधिकरण प्रामुख्याने राजासंबंधीच आहे. यामध्ये अखेरचे प्रकरण राजाचे दैनंदिन व्यवहार (राजप्रणिधि) आहे. सामान्य माणसांच्या संदर्भात हे विषय तितके गंभीर नसले तरी राज्यकर्त्यांच्या संदर्भात हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे कारण तो राज्याच्या केन्द्रस्थानी असतो. राजाच्या अस्तित्वावर इतर घटकांचे अस्तित्व, उत्कर्ष, अपकर्ष अवलंबून आहेत. राजा सुरक्षित नसेल तर राज्यही सुरक्षित नसते. आणि राजाच्या अभावी अराजकाचे संकट ओढवू शकते. त्यामुळे आजही राष्ट्रप्रमुखांचे दैनंदिन व्यवहार सांभाळण्यासाठी स्वतंत्र सचिव असतात. राजाच्या सुरक्षेचे महत्त्व कौटिल्यानेही नेमके जाणले होते. त्यामुळे राजाची सुरक्षा, दैनंदिन वेळापत्रक हे विषय त्याने स्वतंत्र प्रकरणात मांडले आहेत.

'राजप्रणिधि' या प्रकरणात कौटिल्याने राजाचे प्रहरांनुसार वेळापत्रक दिले आहे. पण ते देण्यापूर्वी, मुळात राजाचा स्वभाव उमदा आणि उद्यमशील असावा हे सांगायला तो विसरत नाही. कारण प्रहरांनुसार वेळापत्रक पाळण्यासाठी शारीरिक बलासह, तत्परता, उत्साह इत्यादी गुणांनी युक्त मनोबलाचीही आवश्यकता आहे. सर्वसाधारणपणे संपूर्ण दिवसाचे आठ प्रहर (तीन तासाचा एक प्रहर) मानले जातात. कौटिल्याने मात्र राजाच्या वेळापत्रकाची आखणी करताना संपूर्ण दिवसाचे सोळा भाग कल्पिले आहेत. म्हणजे राजाच्या वेळापत्रकात प्रत्येक भाग दिड तासाचा मानला आहे. या दिड तासाच्या प्रत्येक भागात राजाने कोणती कार्ये करायची ते कौटिल्याने तपशीलवार सांगितले आहे. दिवसाच्या भागांपैकी पहिले चार भाग मध्याह्नीपर्यंत व नंतरचे चार मध्याह्नीनंतर अशी विभागणी केली आहे. राजासाठी कौटिल्याने प्रहरांनुसार आखलेले वेळापत्रक पुढीलप्रमाणे:

दिवसाच्या आठ भागांपैकी पहिल्या भागात संरक्षणव्यवस्था, उत्पन्न तसेच खर्च यांचे तपशील तपासावेत. दुसऱ्या भागात नागरीकांच्या तक्रारी ऐकाव्यात. तिसऱ्या भागात स्नान, भोजन आणि अध्ययन करावे. चौथ्या भागात वसूल झालेल्या द्रव्याचा स्वीकार करावा आणि अध्यक्षांना कामे नेमून द्यावीत. पाचव्या भागात मंत्र्यासह सल्लामसलत करावी आणि हेरांनी आणलेल्या महत्त्वाच्या गुप्त बातम्या ऐकाव्यात. सहाव्या भागात विहार करावा आणि मंत्र्यांसह चर्चा करावी. सातव्या भागात हत्ती, घोडे, रथ आणि सैनिक यांची पाहाणी करावी. आठव्या भागात सेनापतीसह युद्धविषयक विचारविनिमय करावा. दिवस संपताना संध्योपासना करावी.

दिवसाप्रमाणे रात्रीचेही आठ भाग कल्पून त्यानुसार राजासाठी वेळापत्रक दिले आहे. त्यानुसार पहिल्या भागात गुप्तहेरांची

भेट घ्यावी. दुसऱ्या भागात स्नान, भोजन आणि अध्ययन करावे. तिसऱ्या भागात संगीतश्रवण करत बिछान्यावर पडावे. चौथ्या आणि पाचव्या भागात निद्रासुख अनुभवावे. सहाव्या भागात मंगल वाद्यांच्या आवाजाने जागृत होऊन शास्त्र आणि इतिकर्तव्यांचे चिंतन करावे. सातव्या भागात सल्लामसलत करावी आणि गुप्तहेरांना त्यांच्या कामगिरीवर रवाना करावे. आठव्या भागात ऋत्विक्, आचार्य, पुरोहितांकडून स्वस्तिवाचन करून घ्यावे. तसेच वैद्य, मुदपाकखान्याचा प्रमुख आणि ज्योतिषी याची भेट घ्यावी. यानंतर राजसभेत प्रवेश करावा.

वरील वेळापत्रक पाहाता लक्षात येते की राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व कार्यांचा तसेच त्या कार्यांशी निगडित असलेल्या सर्व महत्त्वाच्या अधिकारी व्यक्तींशी राजाचा दररोज विचारविमर्श व्हावा अशी काळजी कौटिल्याने घेतली आहे आणि त्याचबरोबर राजाला दिवसभर काम करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी शारीरिक आणि मानसिक विश्रांती मिळेल याचीही काळजी घेतली आहे.

दररोज एकदा तरी अर्थखाते, संरक्षणखाते, महसूलखाते तसेच आवश्यकतेनुसार इतर खात्यांच्या अधिकाऱ्यांशी भेटी घ्याव्यात अशी व्यवस्था केली आहे. हेरखात्यासाठी दिवस–रात्र या दोन्ही भागात वेळ दिलेला दिसतो. हेरखाते व त्याकडून मिळणाऱ्या माहितीला कौटिल्याने दिलेले महत्त्व या वेळापत्रकातून अधोरेखित होते.

दिवसाचा दुसरा भाग हा निव्वळ प्रजाजनांसाठी राखून ठेवला आहे. कौटिल्य म्हणतो की राजसभेत गेल्यावर काही कार्य करवून घेण्याच्या उद्देशाने आलेल्या व्यक्तीस दरवाज्याजवळ अडवू नये. राजाने प्रजाजनांना भेटणे टाळले किंवा राजाची भेट दुरापास्त असेल तर राजाच्या जवळचे लोक कार्याकार्याची बूज न राखता परिस्थितीचा फायदा घेतात. त्यामुळे राजाविषयी प्रजाजनांचे मत कलुषित होते, राजा प्रजेच्या कोपाला आणि पर्यायाने स्वविनाशाला निमंत्रण देतो. म्हणूनच राजाने देवस्थाने, आश्रम, विद्वान ब्राह्मण, वृद्ध, बाल, व्याधिग्रस्त, पशु, संकटग्रस्त, अनाथ, स्त्रिया, यांची कामे क्रमानुसार पाहावीत. त्या त्या व्यक्तीच्या कामाचे महत्त्व आणि तातडीच्या अनुरोधाने कार्यांचा क्रम आणि प्राथमिकता ठरवावी. तातडीची कामे ऐकून त्यांची तत्काळ कार्यवाही करावी. कोणतेही कार्य लांबले की ते पार पाडणे अधिक कठीण आणि काही वेळा असाध्य होते. थोडक्यात कौटिल्याने राजाच्या दैनंदिन वेळापत्रकात राजाने विविध खाती, त्यांचे अधिकारी, सेनापती, मंत्री, हेर, पुरोहित, आचार्य व सर्वात महत्त्वाचे म्हणजे पौरजन आणि जानपद म्हणजे ग्रामवासी या सर्वांना योग्य अवकाश द्यावा असे सूचित केले आहे.

या सर्व राजकीय, सामाजिक, धार्मिक बांधिलकी व कर्तव्यांसह राजाच्या व्यक्तिगत आयुष्याचा विचारही कौटिल्याने केलेला दिसतो. दिवसाच्या आठ भागांपैकी एक भाग विहारासाठी आहे तर रात्रीच्या आठ भागांपैकी

तीन भाग विश्रांतीसाठी आहेत. स्नान भोजनासाठी असलेल्या भागातही काही वेळ राजाने अध्ययन म्हणजे प्राप्त केलेल्या ज्ञानाची उजळणी करावी अशी अपेक्षा आहे. म्हणजे एकूण वेळापत्रकात राजासाठी व्यक्तिगत वेळ निव्वळ सहा-सात तासांचा आहे. राजाच्या कठोर जीवनक्रमाची व कार्यव्यापृततेची यावरून कल्पना येते. रात्रीच्या सहाव्या भागात, राजाने जागृत झाल्यावर कर्तव्यांचा विचार करावा असे म्हटले आहे जे लक्षणीय आहे. दररोज पहाटे उठल्यावर राजाने आपल्या वर्णाश्रमाधिष्ठित कर्तव्यांचा आणि त्या त्या दिवशी करायच्या कर्तव्यांचा विचार करणे अपेक्षित आहे. कार्याची मानसिक आखणी झालेली असेल की कार्यवाही सुकर होते आणि काळाचा अपव्यय होत नाही. दैनंदिन व्यवस्थापनाच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची सूचना आहे. हे सर्व दैनंदिन वेळापत्रक पाहिल्यावर लक्षात येते की राजाचा मुकुट काटेरी असतो. 'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' हे खरच आहे.

अर्थात हे दैनंदिन व्यवस्थापन आदर्श आणि मार्गदर्शक म्हणून कौटिल्याने दिले आहे. यासंदर्भात आदर्श राजाचे वर्तन त्याने यज्ञरूपकातून स्पष्ट केले आहे. कौटिल्य म्हणतो 'उद्यमशीलता हे राजाचे व्रत आहे, कार्याची अंमलबजावणी हा यज्ञ आहे व सर्व प्रजाननांना समान वागणूक देणे ही यज्ञीय दीक्षा आहे.' याचा अर्थ कौटिल्याच्या मते राज्य करणे हे यज्ञासारखे पवित्र कार्य आहे. यज्ञाप्रमाणे नि:स्वार्थ बुद्धीने 'इदं न मम' या भावनेने राज्य करणे अपेक्षित आहे.

आदर्श आणि मार्गदर्शक म्हणून सांगितलेली ही तत्त्वे सर्वांनाच अगदी सर्व राजांनासुद्धा पाळणे प्रत्येक वेळी शक्य होईल असे नाही म्हणूनच कौटिल्य म्हणतो की ही तत्त्वे राजांनी आपल्या शक्तिनुसार व परिस्थितीनुसार, दिवस आणि रात्र यांचे भाग पाडून पार पाडावीत. याचा अर्थ आपापली कार्यकुशलता, परिस्थिती, काळ, स्थळ इत्यादी गोष्टींना अनुसरून राजाने आपले वेळापत्रक ठरवावे, त्यात बदल करावेत मात्र समय आणि कार्य यांचे व्यवस्थापन व त्याची कार्यवाही अपरिहार्य आहे. लोकशाही अथवा राज्यशाही, राज्यपद्धती कोणतीही असो राष्ट्रप्रमुखाला लक्षात ठेवण्याजोगे त्रिकालाबाधित सत्य या प्रकरणाच्या अखेरीस कौटिल्याने सांगितले आहे. ते पुढीलप्रमाणे:

**'प्रजासुखे सुखं राज्ञ: प्रजानां च हिते हितम्।**
**नात्मप्रियं हितं राज्ञ: प्रजानां तु प्रियं हितम्।।'**

प्रजेच्या सुखात राजाचे सुख आहे आणि प्रजेच्या हितात राजाचे हित आहे. राजाला स्वत:ला जे प्रिय असेल त्यात त्याचे हित नाही, तर प्रजेला जे प्रिय आहे त्यात त्याचे हित आहे. म्हणून राजाने सतत प्रजाहितदक्ष असावे, उद्यमशील राहावे. हेच राजाच्या संपन्नतेचे मूळ आहे.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

# गेले ते दिन गेले...

प्रा. सौ. अनुराधा अशोक पाटील

'गेले ते दिन गेले'... हा निबंधाचा विषय ऐकून मन संभ्रमित झाले. कोणत्या दिनाविषयी लिहू? राजकिय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक का वैचारिक जडणघडणीतला? मग मनाचे खेळ सुरू झाले. पर्यावरण, निसर्ग ह्या भौगोलिक विषयावर लिहावे. पर्यावरणाचा ऱ्हास होतो आहे, प्लास्टीकपासून वाचवा, उंच उंच इमारती थोडक्यात काय सिमेंटचे जंगल उभे राहत आहे. आमच्या निसर्गदेवतेचे - सूर्य, चंद्र दर्शन दुर्लभ झाले आहे हे लिहू? पण नंतर मात्र ठरविले की, भारतीय संस्कृतीबद्दल लिहावे. कारण भारतीय संस्कृती म्हणजे सहानुभूती, विशाल ज्ञानाचा मागोवा घेणारी आहे. सर्व धर्मांचा मेळ, सर्व जातींचा मेळ, ज्ञान विज्ञानाचा मेळ आणि सकल मानव जातीचा मेळा, मांगल्याकडे घेऊन जाऊ पाहणारी अशी ही थोर संस्कृती! पण हाय रे दैवा, ही संस्कृती पण लोप पावत चालली आहे. 'घनश्याम सुंदरा, श्रीधरा, अरुणोदय झाला' ह्या पाळीने मराठी माणूस जागा होई, सडा समार्जन गाईचे हंबरणे, गाईच्या धारा सगळेच हरवले, न्याहरी कांदे पोहे, उपमा, थालीपीठ वगैरेची जागा आता पिझ्झा, बर्गर, समोसा, पॅटीसने घेतली. पूर्वी असे खाणे निषिद्ध मानले जाई. ''भात, वरण, भाजी, आमटी, चटणी, भाकरी हाच मेनू होता घरोघरी'' मूळात तो काळच काटकसरीचा होता, खवय्ये नावाचा प्राणीच जन्मास आला नव्हता.

आजकाल प्रवासातील निसर्गरम्य सुखद दर्शनसुद्धा कोणी घेत नाही, मुले मोबाईलची खेळण्यात दंग तर आईबाबा व्हॉटस् ॲपवर, अगदी आजी आजोबासुद्धा सासू-सूनांच्या नगण्य अशा मालिकांमध्ये दंग असतात. वर्षातून एकदा येणाऱ्या व्याख्यानमालेत ह्यांची गैरहजेरी कारण काय तर 'चार दिवस सासूचे' चा महाएपिसोड आहे. 'आदर्शला' केव्हाच मूठमाती दिली आहे. आत्यंतिक लाडामुळे दोन निर्माण झाले आहेत. संस्काराची नाळ तुटली आहे. पूर्वी डोळे वटारले तरी मुले थरथर कापायची पण आता आपल्यालाच त्यांना घाबरावे लागते. एकतर घरातून निघून तरी जातात, नाहीतर आत्महत्या तरी करतात. कुठे गेला हा धाक आणि दरारा, मुलांना दुष्कृत्यापासून दूर ठेवणारा! सर्वांची 'अळीमिळी गूपचिळी' झाली आहे. श्रमाचे महत्व केव्हाच संपले आहे. दैवी संपत्तच्या मागे तरुणाई लागली आहे. पण ही असूरी संपत्ती आरोग्य कसे विनाशाकडे नेते हे सांगायला कुणीच धजत नाही. चाणक्य म्हणतात, आत्यंतिक लाडाने दोष निर्माण होतात. तर दंड दिल्याने गुण निर्माण होतात. पण मग 'लालन पालन की ताडन मारन' याचा विचार करावा लागेल आणि खरंच 'पायाला घाण लागू नये म्हणून जसे जपावे तसे मनाला घाण लागू नये म्हणून जप हा महामंत्र देणारी श्यामची आई जर घरोघरी असेल तर देशप्रेम व मानवतेचा विचार नवे चैतन्य व सामर्थ्य निर्माण करतील. नवी

पिढी बुद्धीवादाचा पुरस्कार करणारी आहे. भावनेच्या जाळ्यात ते कधीच गुंतुन पडणार नाहीत. मनाचे खेळ न करता वास्तवाला सामोरे जायची त्यांच्यात धमक पण आहे आणि चमक पण. म्हणूनच मायदेशी न रहाता परदेशातली भल्यामोठ्या पगाराची चाकरी करतात. तेथेच स्थायिक होतात. वर्षातून एकदा भारतात येतात, नंतर कालावधी पण वाढत जातो. देवकार्य, मंगलकार्याला सोडाच, आईवडिलांना अग्नी द्यायलासुद्धा ती वेळेवर पोहोचू शकत नाही. आताच मध्यंतरी वाचनात आले वृद्धाश्रमातल्या सहकाऱ्यांनीच अग्नी दिला. दिवस कार्य केले, इथेच ऋणानुबंध संपले. ''आई माझा गुरु तीच माझी कल्पतरु'' म्हणणारे साने गुरुजी आणि मनुष्य अन्नावाचून जगेल पण प्रेमावाचून जगणार नाही अशी प्रेमाची भूक फुलवणारी साने गुरुजींची आई असे हे मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र आणि मायेचा झरा पुन्हा जन्म घेईल का? वृद्ध मातापित्याना कावडीमध्ये बसवून काशी यात्रेला नेणारा सेवाभावी श्रावणबाळ परत जन्मेल का? बंधूप्रेम जपणारे राम लक्ष्मण परत भारत वर्षात फिरुनी येतील का? गुरू निष्ठा जपणारा अर्जुन पुन्हा ह्या धरतीवर जन्म घेईल कां? अशीच अमुची आई असती सुंदर रुपवती, आम्हीही सुंदर झालो असतो वदले छत्रपती, धन्य ते शिवाजी आणि धन्य त्या जिजामाता! ती केवळ प्राकृतिक आई नव्हती तर संस्काराची जननी होती. त्याचप्रमाणे जनी म्हणे देवा, घडो मज सेवा' म्हणणारी जनाबाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत ज्ञानदेव, संत कबीर अशा भारतभूमीतल्या खाणीतील संस्काराची रत्ने पुनर्जन्म घेतील का? गेले ते दिन गेले... असे न म्हणता जीवन विशुद्ध व विशाल बनवायचे असेल तर तरुणाईंच्या मनात देशप्रेम व मानवतेचा विचार रुजवायला हवा त्यांच्यात चैतन्य, सामर्थ्य, जिद्द निर्माण करणारी शक्ती जागवायला हवी, गेले ते दिन गेले न म्हणता ते दिन परत येण्याची वाट पहायला काय हरकत आहे, सकारात्मक विचार करुया.

**प्रा. सौ. अनुराधा अशोक पाटील**
**M. Sc. D.H.E.**

●●●

---

(पृष्ठ क्र. २० वरून... **सुभाषित-कथा मित्रभेद**)

चपळाईने ढेकूण पलंगावरील फटीत जाऊन लपला. पण मंदविसर्पिणी मात्र पळून जाण्यास असमर्थ ठरली. सेवकांना सापडली व त्यांनी तिला ठार मारले. म्हणूनच म्हटले आहे की ज्याचे कुळ-शील ठाऊक नाही अशांना आश्रय देऊ नये. अन्यथ मंदविसर्पिणीप्रमाणे सर्वनाश होतो.

**- श्रीकांत अनंत बर्वे**
१/ए/१३१, कल्पतरु हिल्स,
टिकुजीनी वाडीसमोर, मानपाडा,
ठाणे - ४०० ६१०.
भ्रमणध्वनी : ९६१९०६००१५

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

झाले आहेत की, यातल्या अनेक सणांनी त्यांचा आशयही आज हरवला आहे. कित्येक कुटुंबामधून एक परंपरा किंवा प्रथा म्हणूनच ते आज साजरे केले जातात. कुटुंबाला एकत्र आणण्याचा यातला आशय मात्र यातून नक्की साध्य होतो. हे जरी खरं असलं तरी आजच्या सणांच्या स्वरुपामध्ये हजारोंनी लोक सामील होतात. त्यात येणारे नाच, गाणी, ध्वनीप्रदूषण, यात आपले कुठतरी चुकतंय, हेही कदाचित त्यांच्या लक्षात येत असेल. पण तरीही ते असे का वागतात याचा मनोसामाजिक अभ्यास होणे आवश्यक आहे.

या सण, व उत्सवांच्या सार्वत्रीकीकरणाचे नेतृत्व आज संपूर्णतया धटींगणांच्या हातात गेले आहे. समाजाने आपले सारासार-विवेकी, प्रगल्भ नेतृत्व हरवलं आहे का? अशा नेतृत्वाच्या निर्मितीसाठी हवी असलेली सामाजिक परिस्थिती आज महाराष्ट्राने गमावली आहे का? असे अनेक प्रश्न पडतात, आणि मग या सर्वांचा विचार आपल्याला इतिहासात डोकावून करावा लागतो.

इतिहासाचा अभ्यास म्हणजे केवळ सणावळ्यांची जंत्री नाही. आपण वर बघितल्याप्रमाणे ते तत्कालिन समाजाचे प्रतिबिंबच असते. आधुनिक भारताचे एक अभ्यासक थॉमस ट्रॉटमन (Thomas Trautman) यांनी "The Past in the Present" या आपल्या लेखाची सुरुवातच मुळी इतिहास म्हणजे काय? या टिपणीने केली आहे. ते म्हणतात,

" .... that the ancient past is essential to the understanding of the present because the past lives in the present. If the argument succeeds it follows that the study of ancient history is not something that comes to an end at some date in the past, but has a continuing life in the present. It also follows that historians of the recent past cannot elucidate their field fully without the help of historians of the ancient past. It is not easy to demonstrate, because contemporary forces actively tried the continuing life of the past in the present. The hiddenness of this history is produced."

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाचे सार्वत्रीकीकरण केले, तसेच त्यांनी शिवजयंती उत्सवही साजरा करवला होता. त्यांचा तत्कालीन संदर्भ आपण स्वातंत्र्यलढ्याशी जोडतो. गणपती उत्सवामुळे लोक एकत्र येतात. त्यांच्यापुढे केलेल्या भाषणांच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्याला दिशा देण्याचे काम करता येणे शक्य होते हा हेतू त्यात नक्कीच होता. पण तो तेवढ्यापुरताच सीमित होता का? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुढे काय? प्रबुद्ध, प्रगल्भ समाजच स्वातंत्र्य टिकवू शकतो. उत्सव हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम होऊ शकते हा दृष्टीकोन लोकमान्य टिळकांचा नक्कीच होता.

गणपती ही बुद्धीची देवता आहे. तशीच ती कला व सृजनाचीही देवता आहे. विद्येच्या माध्यमातून आपण सारासार विचार, आणि विवेक साधू शकतो. स्वातंत्र्यानंतर अनेक संस्थांची निर्मितीसुद्धा आवश्यक होती. गणपती उत्सवाला सार्वत्रिक करण्यामागे टिळकांचा हाही हेतू असू शकतो का?

टिळकांचे केसरीमधील काही अग्रलेख

आणि इतर वाङ्मयाचा अभ्यास केला तर गणपतीची म्हणजे बुद्धीच्या देवतेची त्यांनी का निवड केली असावी याचे उत्तर आपल्याला नक्कीच शोधता येते.

तोच प्रश्न शिवजयंतीचा आहे. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवली. निवडक मावळ्यांची सेना निर्माण करून गनीमी काव्यानी औरंगजेबाचे मोगली आक्रमण दक्षिणेकडे त्यांनी थांबवले. पण शिवाजी महाराजांनाही अभिप्रेत असलेला सुजाण, विवेकी समाज निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाकडे आपण फारसे लक्ष देत नाही. लढाई जिंकणं एकवेळ सोपं असतं पण प्रगल्भ समाज निर्मिती ही सोपी गोष्ट नसते. त्याची आयुधं वेगळी असतात.

स्वराज्याला स्वतःची भाषा असावी लागते. तत्कालीन मराठी भाषा ही सहाजिकच इस्लामी आक्रमणांमुळे उर्दू व फारसी युक्त झाली होती. महाराजांनी 'राज्यव्यवहारकोशा'ची निर्मिती करून भाषाशुद्धीचा पहिला प्रयत्न केला. त्यांनी फारसी, उर्दू शब्दांना संस्कृत पर्याय दिले. वजीराच्या ऐवजी प्रधान, दिवाणच्या ऐवजी सचीव, सेनापती, सुमंत, आमात्य, न्यायाधीश हे आजच्या मराठीत वापरले जाणारे शब्द ही या कोशाचीच देणगी आहे. इतिहासकार वि. का. राजवाडे यांनी संशोधनामधून हे दाखवून दिले आहे की १६२८ साली तत्कालीन मराठी पत्रलेखनामध्ये मराठी शब्दांचे प्रमाण फक्त १४.४% होते, १६७७ साली ते ६२.०७% इतके झाले, तर १७२८ मध्ये ते ९३.७% पर्यंत वाढले. भाषाशुद्धीच्या या चळवळीला पुढे हातभार सावरकरांनी लावला. १९२४ साली सावरकरांनी मराठी भाषेच्या शुद्धीकरणावर केसरीमध्ये लेख लिहले होते. दिनांक, नगरपालिका, महापौर, दूरदर्शन, शिरगणती, ध्वनिक्षेपक असे अनेक शब्द सावरकरांनी आपल्याला दिले आहेत.

हिंदूंच्या दैनंदिन व्यवहारांप्रमाणेच त्यांच्या सणांना मार्गदर्शक असते ते पंचांग. भारतीयांचे गणितात असलेले योगदान आज सर्वमान्य आहे. पंचांग निर्मिती करिता ग्रहताऱ्यांचे प्रत्यक्ष वेध घेऊन गणिती कोष्टकं मांडावी लागतात. शिवाजी महाराजांच्या काळी, गणेश दैवज्ञ या मराठी गणितज्ञाने १५२० साली लिहिलेला 'ग्रहलाघव' हा ग्रंथ वापरला जात असे. प्रत्येक शतकामध्ये वेध घेऊन अशी पंचागे तयार करावी लागतात. नाहीतर पंचांगामधील नक्षत्र व वस्तुस्थिती यात तफावत निर्माण होते. सतराव्या शतकात अशी तफावत निर्माण झाली होती. शिवाजी महाराजांनी कृष्णदैवज्ञ या खगोलशास्त्रीयाकडून 'करणकौस्तुभ' हा दृक्प्रत्ययी ग्रंथ तयार करून घेतला. केवढी मोठी दूरदृष्टी महाराजांनी यात दाखवली होती. कृष्णदैवज्ञांनी 'तंत्ररत्न' हा खगोलशास्त्रीय ग्रंथही लिहिला होता. दुर्दैवाने तो आज उपलब्ध नाही.

१९९० नंतर शिकागो, अमेरिका येथे दक्षिण आशियाच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी, भारतात इंग्रजी वसाहत सुरु व्हायच्या आधीच्या साहित्याच्या अभ्यासाला सुरुवात केली. आज त्याचे काही खंड प्रकाशितही झाले आहेत. शेल्डन पोलॉक हे त्यातील एक अभ्यासक. नीलकंठ चतुर्धर यांची संस्कृतमधील महाभारतावरील टीका प्रसिद्ध आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात

त्यांनी ही टीका लिहिली. महाभारतावरील एक प्रमाणभूत टीका म्हणून सबंध भारतभर ती प्रसिद्ध आहे. ही टीका लिहिण्याकरता नीलकंठ यांना महाराजांनी प्रोत्साहित केले होते हे शेल्डन पोलॉक यांनी नमूद केले आहे.

लोकमान्य टिळकांना गणपती आणि शिवजयंती उत्सव यांच्या सार्वत्रिकीकरणामागे प्रबोधनाबरोबरच व्यवस्थाशुद्धी हा ही हेतू असू शकतो हे आपण कधीच विचारात घेतलेलं दिसत नाही. ७० वर्षांनंतर आज आपल्या स्वातंत्र्याची काय परिस्थिती आहे? भौगोलिक स्वातंत्र्य हे जेवढे महत्वाचे असते, तेवढेच सांस्कृतिक, व सामाजिक स्वातंत्र्य हेही महत्वाचे असते. एकंदरीतच आपला आजचा संस्कृतीचा प्रवास हा पाश्चिमात्य संस्कृतीच्या गुलामगिरीच्या दिशेने चालू आहे. पाश्चात्य संस्कृतीमध्ये असलेला सारासार विवेक, संशोधनवृत्ती, तारतम्य या कशाचाच स्वीकार न करता, त्यांचा चंगळवाद मात्र आपण संदर्भ सोडून घेत आहोत.

दुर्दैवाने संस्कृती आणि परंपरेच्या रक्षणाच्या नावाखाली आजच्या दहीहंडी व गणेशोत्सवाने जे रुप धारण केले आहे ते आत्मघातकी आणि अभिरुचीहीन समाज निर्माण करणारे आहे. सर्जनाची, भरीव, रेखीव करण्याची क्षमता हरवलेला समाज यातून निर्माण होत आहे. लोकमान्यांच्या मूळ हेतूच्या बरोबर विरुद्ध गोष्टी परंपरेच्या नावाखाली आज होत आहेत.

यावर्षी विसर्जनाच्यावेळी ३५-४० जणांना नाहक आपला जीव गमवावा लागला. दहिहंडीच्या बक्षिसांपासून गणपतीच्या मंडपांकरता अक्षरशः हजारो कोटी रुपये आपण दरवर्षी खर्च करीत आहोत. तरिही लाखोंच्या संख्येनी आम्ही 'मागासलेले' आहोत म्हणून मोर्चेही काढत आहोत.

सरकार किंवा पोलिसांच्या नाकर्तेपणामुळे साथीच्या रोगासारखी या उन्मादी सणांची लागण आज खेडोपाडी पसरत आहे. न्यायालयाने घालून दिलेले आदेशही न पाळणे हे आज पुरुषार्थाचे लक्षण होऊन बसले आहे. सार्वजनिक गणपतींची उंची असो, किंवा बळजबरीने जमा होणारी वर्गणी असो, सगळ्यांनीच तारतम्याच्या लक्ष्मणरेषा ओलांडल्या आहेत. यात सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या सगळ्यांचे उघड किंवा छुपे समर्थन आणि नेतृत्व आजचे सगळेच राजकीय पक्ष करत आहेत. 'सवंग' लोकानुनय हेच यांचे भांडवल आहे. प्रबोधनाची क्षमता या नेतृत्वांनी केव्हाच हरवली आहे.

रस्ते अडवून, सर्व घालून दिलेले नियम धाब्यावर बसवून साजरा होणारा दहीहंडीचा सण काय? किंवा बीभत्स गाण्यावर नाचत निघणाऱ्या गणपतीच्या आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणूका काय? आपल्या संस्कृतीचा इतिहास, उत्सवांची आणि सण साजरे करण्याची हिच परंपरा आपल्याला दाखवतात का? आपण हे कधीच थांबवू शकणार नाही का? ●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१